
रायगड, नवी मुंबई
राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक ४२
www.ramprahar.com
सोमवार, २८ ऑगस्ट २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

अंतरंग

आपटा येथे विविध विकासकामांचा शुभारंभ/३
'सर्वसामान्य जनतेला अर्थसाक्षर करणे गरजेचे'/५
मांडवा येथे नारळीपौर्णिमेला राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा/८

## श्रीवर्धन समुद्रकिनारी आढळली अमली पदार्थांची पिशवी



**श्रीवर्धन** : येथील खालचा जीवना परिसरात सागरी गस्तीचे पोलीस शिपाई दर्शन गायकवाड यांना रविवारी (दि. २७) सायंकाळी साडेपाचच्या सुमारास एक पिशवी आढळून आली. याबाबतची माहिती त्यांनी श्रीवर्धन पोलीस ठाण्यात दिल्यानंतर निरीक्षक उत्तम रिकामे व उपविभागीय अधिकारी प्रशांत स्वामी कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी दाखल झाले. ही पिशवी समुद्राच्या पाण्याबरोबर किनाऱ्यालगत वाहून आल्याचे दिसून आले तसेच पिशवीच्या आतील भागात एकूण नऊ प्लास्टिक पिशव्या आढळून आल्या. या पिशव्यांमध्ये चरस नावाचा अमली पदार्थ असण्याची शक्यता आहे. पोलिसांनी घटनास्थळी शासकीय पंच बोलावून याचा पंचनामा केला. काही दिवसांपूर्वी रत्नागिरीतील दापोली समुद्रकिनारीदेखील अशाच प्रकारे अमली पदार्थांच्या पिशव्या आढळल्या होत्या. त्या पार्श्वभूमीवर पोलिसांकडून तपास सुरू झाला आहे.

# विरोधकांनी विकासावर बोलावे

### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आव्हान; परभणीत शासन आपल्या दारी!

**परभणी : प्रतिनिधी**

परभणीत रविवारी (दि. २७) शासन आपल्या दारी अभियानाचा कार्यक्रम झाला. या वेळी बोलताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधी पक्षांवर हल्लाबोल केला. आमचे विरोधक सकाळपासून रात्रीपर्यंत टीकाच करतात. एक भोंगा सकाळी ९ वाजता सुरू होतो आणि रात्री १० वाजेपर्यंत दुसरे भोंगे सुरू असतात. आमच्यावर पाहिजे तेवढी टीका करा. आम्ही टीकेला घाबरत नाही, पण विकासाच्या मुद्द्यावर बोला, असे आव्हान त्यांनी या वेळी म्हणाले.

या कार्यक्रमास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार हेमंत पाटील, आमदार सर्वस्वी बाबजानी दुराणी, विप्लव बाजोरिया, रत्नाकर गुट्टे, मेघना बोर्डीकर, विक्रम काळे, सुरेश वरपूडकर, माजी मंत्री अर्जुन खोतकर, माजी खासदार सुरेश जाधव, गणेश दुधगावकर, माजी आमदार हरीभाऊ लहाने, हरिभाऊ आंबेगावकर, गोपिकीशन बाजोरिया यांच्यासह अधिकारी, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने लाभार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमात परभणी जिल्ह्यातील तब्बल साडेआठ लाख लाभार्थ्यांना १५०० कोटी रुपयांच्या विविध योजनांचे लाभ मिळवून देण्यात आले. (पान २ वर..)



### ऑनलाईनवरून 'त्यांना' लाईनवर आणले –मुख्यमंत्री

महाविकास आघाडी सरकारच्या काळात कायम घरात बसून राज्याचा कारभार ऑनलाईनवर पाहणाऱ्यांना आम्ही लाईनवर आणण्याचे काम केले. त्यांना असा झटका आमच्या माध्यमातून मिळाला की ते थेट लाइनवरच आल्याचा टोला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना या वेळी लगावला. विरोधकांच्या भूलथापांना बळी न पडता नागरिकांनी विकासकामे करणाऱ्या या महायुतीच्या सरकारला पाठिंबा द्यावा, असे आवाहनही त्यांनी या कार्यक्रमाच्या माध्यमातून केले.

## भाजप जिल्हा कार्यालयाचे आज भूमिपूजन आणि पनवेल मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन

### मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते होणार शुभारंभ



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाच्या नव्याने उभारण्यात येणाऱ्या उत्तर रायगड जिल्हा कार्यालयाचे भूमिपूजन तसेच नूतनीकरण केलेल्या पनवेल मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन सोमवारी (दि. २८) राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली व आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

उत्तर रायगड जिल्हा भाजपचे कार्यालय पनवेल तालुक्यातील डेरवली येथे उभारण्यात येणार असून त्याचे भूमिपूजन सकाळी ९.३० वाजता करण्यात येणार आहे, तर पनवेल शहरात रूपाली सिनेमागृहाजवळ असलेल्या मध्यवर्ती कार्यालयाचे नूतनीकरण करण्यात आले असून त्याचे उद्घाटन सकाळी १०.३० वाजता होणार आहे.

या कार्यक्रमास पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल तालुका मंडल अध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर मंडल अध्यक्ष जयंत पगडे, कामोठे मंडल अध्यक्ष रवींद्र जोशी, कळंबोली मंडल अध्यक्ष रविनाथ पाटील, खारघर मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, उरण मंडल अध्यक्ष रवी भोईर, खालापूर मंडल अध्यक्ष रामदास ठोंबरे, कर्जत मंडल अध्यक्ष मंगेश म्हसकर, खोपोली मंडल अध्यक्ष रमेश रेटरेकर यांनी केले आहे.

# मनसेच्या पदयात्रेमुळे वाहतूक कोंडी; प्रवासी, वाहनचालकांची रखडपट्टी

**पाली : प्रतिनिधी**

मुंबई–गोवा महामार्गाचे काम वेगाने सुरू असताना मनसेच्या वतीने युवा नेते अमित ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली रविवारी (दि. २७) कोकण जागर पदयात्रा काढण्यात आली. या वेळी झालेल्या वाहतूक कोंडीने प्रवासी व वाहनचालकांची रखडपट्टी झाली. त्यामुळे त्यांनी या यात्रेबद्दल नाराजी व्यक्त केली.

मनसे पदाधिकारी व कार्यकर्ते पदयात्रेसाठी मुंबई–गोवा महामार्गावर जमले होते. त्यांचीही वाहने महामार्गावर होती. त्यामुळे सकाळपासूनच पळस्पे ते कर्नाळा अभयारण्य मार्गावर वाहतूक कोंडी झाली. अवघे पाच ते सहा किमीचे अंतर कापण्यासाठी वाहनांना दीड ते दोन तास लागले. याबरोबरच पेण, नागोठणे येथेही वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. त्यामुळे प्रवासी व वाहनचालकांचा खोळंबा झाला.


(छाया : धम्मशील सावंत)

### मुंबई-गोवा महामार्गावर अवजड वाहनांना २८ सप्टेंबरपर्यंत बंदी

**अलिबाग : प्रतिनिधी**

मुंबई–गोवा महामार्गाच्या कामाला अधिक गती देता यावी यासाठी रविवार (दि. २७) पासून या महामार्गावरील अवजड वाहतूक बंद ठेवण्यात येणार आहे. वाहतूक पोलिसांकडून याबाबतची अधिसूचना जारी करण्यात आली आहे. जीवनावश्यक वस्तूंची वाहतूक करणाऱ्या वाहनांना यातून सूट देण्यात आली आहे.

मुंबई–गोवा महामार्गाचे काम जोमाने सुरू आहे. या कामाला अधिक वेग मिळावा यासाठी अवजड वाहनांच्या बंदीचा निर्णय घेण्यात आला आहे. रस्त्याचे काम सुरू असल्याने सध्या एका मार्गिकेतून वाहतूक होत आहे. या ठिकाणी अवजड वाहनांमुळे सातत्याने वाहतूक कोंडी निर्माण होत असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे महामार्गावरील वाहतूक नियंत्रित करण्यात यावी, अशी मागणी महामार्ग प्राधिकरणाने केली होती. त्यानुसार वाहतूक पोलिसांकडून याबाबतची अधिसूचना जारी करण्यात आली. गणेशोत्सव काळात कोकणात जाणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठी असते. त्यांचा प्रवास सुरक्षित आणि निर्विघ्न व्हावा या दृष्टीनेही हा निर्णय घेण्यात आला आहे. २८ सप्टेंबर हा बंदी आदेश लागू राहणार आहे.

**असा आहे पर्यायी मार्ग**

मुंबई–गोवा महामार्गावर अवजड वाहनांना बंदी घालण्यात आल्याने ही वाहतूक पळस्पे फाटा येथून कोन फाटा पुढे मुंबई–पुणे द्रुतगती महामार्गाचा वापर करून खालापूर येथून पाली–वाकणमार्गे वळविण्यात येणार आहे.



पनवेल : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एकपात्री व द्विपात्री अभिनय स्पर्धेची अंतिम फेरी रविवारी मंडळाच्या सभागृहात रंगली. अंतिम फेरीचे उद्‌घाटन मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे उपाध्यक्ष तथा महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते आणि निर्मात्या कल्पना कोठारी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. (वृत्त व अधिक छायाचित्रे पान ३ वर..)

## मुंबईत आग; तिघांचा मृत्यू

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील सांताक्रूझ येथील गॅलेक्सी हॉटेलला रविवारी (दि. २७) भीषण आग लागून तीन जणांचा मृत्यू आणि पाच जण जखमी झाले आहेत.


या आगीत रुपल कांजी (वय २५), किशन (वय २८) आणि कांतीलाल गोरधन वारा (वय ४८) या तिघांचा मृत्यू झाला, तर पाच जण जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. अथक प्रयत्नानंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले.

## रेवदंडा बंदरात अवैध डिझेलविक्री; चौकडी जेरबंद


**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा येथील समुद्रात अवैधरित्या डिझेल विक्री करणाऱ्या बोटीवर पोलिसांनी रविवारी (दि. २७) मध्यरात्री छापा टाकला आणि चौघांना अटक केली आहे.

रेवदंडा रेती बंदरनजीक एक इंजिन बोट समुद्रातील अन्य बोटींना अवैधरित्या डिझेल विक्री करीत असल्याची खबर लागल्यावर खोपोली ठाणे निरीक्षक शीतल राऊत यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने सापळा रचला. या वेळी एका बोटीत बेकायदेशीररित्या साठा केलेले २२५० लिटर डिझेल हस्तगत करण्यात आले. पोलिसांनी एकूण १७ लाख ११ हजार ५०० रुपयांचा ऐवज ताब्यात घेतला.



या प्रकरणी बोटीवरील तांडेल परशुराम सदाशिव कोळी (वय ४९), मारुती दामोदर कोळी (वय ५३), यज्ञेश रामा कोळी (वय ३३, सर्व रा. रेवस गाव) आणि विनायक तुळशीराम कोळी (वय ३८, रा. बोडणी) यांना पोलिसांनी अटक केली आहे तसेच याबाबत रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे.



भारतीय जनता पार्टी
उत्तर रायगड जिल्हा
सस्नेह निमंत्रण

नव्याने उभारण्यात येणाऱ्या जिल्हा कार्यालयाचे भूमीपुजन तसेच नुतनीकरण केलेल्या **पनवेल मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन** सोमवार दि. 28 ऑगस्ट 2023 रोजी महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री **मा. ना. रविंद्रजी चव्हाण साहेब** यांच्या शुभहस्ते व **माजी खासदार लोकनेते मा. श्री. रामशेठजी ठाकूर साहेब** यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. **मा. आमदार श्री. प्रशांतजी ठाकूर, मा. आमदार श्री. महेशजी बालदी** यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणाऱ्या या कार्यक्रमास आपण आपल्या सहकाऱ्यांसह उपस्थित रहावे.

- **भूमीपुजन समारंभ : सकाळी 09.30 वाजता**
  **ठिकाण :- डेरवली, ता. पनवेल, जि. रायगड**
- **उद्घाटन समारंभ : सकाळी 10.30 वाजता**
  **ठिकाण : ॲस्पायर प्राईड, रूपाली सिनेमासमोर, पनवेल शहर**

निमंत्रक

अविनाश कोळी (अध्यक्ष, उत्तर रायगड जिल्हा)
अरुणशेठ भगत (अध्यक्ष, पनवेल ग्रामीण मंडल)
जयंत पगडे (अध्यक्ष, पनवेल शहर मंडल)
रवींद्र जोशी (अध्यक्ष, कामोठे मंडल)
रविनाथ पाटील (अध्यक्ष, कळंबोली मंडल)
ब्रिजेश पटेल (अध्यक्ष, खारघर मंडल)
रवी भोईर (अध्यक्ष, उरण मंडल)
रमेश रेटरेकर (अध्यक्ष, खोपोली मंडल)
मंगेश म्हसकर (अध्यक्ष, कर्जत मंडल)
रामदास ठोंबरे (अध्यक्ष, खालापूर मंडल)

# रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये इन्व्हेस्टिचर सेरेमनी उत्साहात

### मान्यवरांची उपस्थिती; विद्यार्थी, शिक्षकांचा गुणगौरव




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत इन्व्हेस्टिचर सेरेमनी शनिवारी (दि. २६) मोठ्या उत्साहात झाली. या वेळी यशस्वी विद्यार्थी तसेच शिक्षकांचा गुणगौरव करण्यात आला.

दरवर्षी ७ ऑगस्ट हा रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचा वर्धापन दिन मान्यवर व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत इन्व्हेस्टिचर सेरेमनी म्हणून साजरा केला जातो. या वर्षी अतिवृष्टीमुळे हा कार्यक्रम त्या दिवशी न घेता रविवारी दिमाखात झाला. ही शाळा खारघर पनवेलसह नवी मुंबई परिसरात सीबीएसई बोर्डाची एक नामांकित शाळा म्हणून नावारूपास आलेली आहे. या शाळेचे विद्यार्थी आज जगभरात वेगवेगळ्या ठिकाणी आयआयटी, एमबीबीएस, एलएलबी, बीटेकचे शिक्षण घेत आहेत. वर्धापन दिनी शाळेतून निवडलेले विद्यार्थी प्रतिनिधी (कौन्सिल मेंबर्स) शपथ घेतात.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांच्या समूह गायनाने झाली. यानंतर आदित्य ठाकूर याने संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याबद्दल परिचय करून दिला, तर त्याच्यासह हेड बॉय अभिमन्यू कृष्णराज, असिस्टंट हेड बॉय अपूर्व ठाकूर, हेड गर्ल मन्नत ठाकूर, असिस्टंट हेड गर्ल अनुष्का जाधव यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर व व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पहार घालून सन्मान केला.

या कार्यक्रमास संस्थेच्या संचालक शकुंतला ठाकूर, परेश ठाकूर, वर्षा ठाकूर, अर्चना ठाकूर, अमोघ ठाकूर, भाजप खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, (पान २ वर..)

# मुंबईतील प्रकल्पांना जपानची मदत -उपमुख्यमंत्री फडणवीस

## वर्सोवा-विरार सागरी सेतू, पूर व्यवस्थापन प्रकल्पांचा समावेश

**मुंबई : प्रतिनिधी**

वर्सोवा-विरार सागरी सेतू प्रकल्प, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते वडाळा मेट्रो-११ तसेच मुंबई पूर व्यवस्थापन प्रकल्प यांसारख्या पायाभूत प्रकल्पांसाठी जपानने आर्थिक मदत करण्याचे आश्वासन दिले असून जपानी उद्योगांना भारतात यायचे आहे. हे माझ्या जपानच्या दौऱ्याचे फलित आहे, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी सांगितले. सहा दिवसांचा जपानचा दौरा करून त्यांचे शनिवारी (दि. २७) मुंबई विमानतळावर आगमन झाले.



मुंबई विमानतळावर पालकमंत्री दीपक केसरकर, मुंबई भाजपचे अध्यक्ष आशिष शेलार, कृपाशंकर सिंग यांनी त्यांचे स्वागत केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४पासून या देशाबरोबर जे नाते निर्माण केले आहे, त्यामुळे जपान हा देश भारताला मोठ्या प्रमाणात सहकार्य करीत आहे. या दौऱ्यात जपान सरकारचे मंत्री, पंतप्रधानांचे सल्लागार, विविध कंपन्या, त्यांचे अधिकारी यांच्यासोबत बैठका झाल्या. राज्यात आपण वर्सोवा-विरार सागरी सेतू प्रकल्प बांधत आहोत. त्यासाठी आर्थिक मदत देण्यास जपान सरकारने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. जायका, जेट्रो या कंपन्यांशी चर्चा झाली आहे, तर सोनी ही कंपनीही गुंतवणूक करणार आहे, अशी माहिती फडणवीस यांनी यावेळी दिली.

जपानी उद्योगांना भारतात यायचे आहे. चीनमधील गुंतवणूक त्यांना सुरक्षित वाटत नाही. भारताकडे ते सुरक्षित देश म्हणून पाहत आहेत. त्यातील मोठा वाटा महाराष्ट्रात यावा, असा आपला प्रयत्न राहील. मुख्यमंत्र्यांच्या मंजुरीने आपण यासाठी एक विशेष पथक तयार करणार आहोत.

जपानी भाषेचे उत्तम ज्ञान असणारे लोक त्यात असतील. डेटा सेंटर्स ते सेमी कंडक्टर, अशा सर्व क्षेत्रांत ही गुंतवणूक आणली जाईल, असा विश्वासही फडणवीस यांनी व्यक्त केला.

चंद्रयान-३ मोहीम पाहण्याचा आनंद मराठी बांधव मोठ्या संख्येने जपानमध्ये एकत्रित घेत होते. त्यांच्यासोबत राहून मला हा सोहोळा पाहता आला, याचा मला अतिशय आनंद झाला आहे. कोयासन विद्यापीठाने मला मानद डॉक्टरेट ही पदवी दिली. हा माझा नाही, तर महाराष्ट्राचा सन्मान आहे, असेही फडणवीस म्हणाले.

# आंबेनळी घाटातील संरक्षक कठड्याच्या सामानाची चोरी

## महाड एमआयडीसी पोलिसांकडून तिघे मुद्देमालासह अटकेत





**पोलादपूर : प्रतिनिधी**

आंबेनळी घाटातील लोखंडी संरक्षक कठड्यांचे सामान चोरल्याची तक्रार पोलादपूर पोलीस ठाण्यामध्ये शनिवारी (दि. २६) दाखल करण्यात आली होती. महाड एमआयडीसी पोलिसांनी रात्रीच्या गस्तीदरम्यान पोलादपूरहून महाडच्या दिशेने एका महिंद्रा झायलो गाडीला अडवून तपास केला असता हा मुद्देमाल वाहनासह जप्त केला असल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक मारूती आंधळे यांनी दिली.

या चोरटयांनी एकूण आठ लाख दोन हजार ९०० रूपये किमतीचे लोखंडी संरक्षक कठडे उभारण्याचे सामान चोरून नेले होते. महाड औद्योगिक वसाहतीच्या पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरिक्षक आंधळे आणि सहकारी शनिवारी रात्री मुंबई-गोवा महामार्गावर वाहनांची झडती घेत असताना अचानक पोलादपूरहून येणाऱ्या झायलो गाडीचा संशय आल्याने गाडीची झाडाझडती घेतली असता गाडीमध्ये चोरून आणलेले स्टिलचे व लोखंडी अँगल दिसून आले. चोरून आणलेल्या मुद्देमालासह कार (एमएच ०६ एडब्ल्यू ६०६८) महाड एमआयडीसी पोलिसांनी जप्त केली असून तीन आरोपींनादेखील गजाआड केले आहे.

या तीन आरोपींपैकी आरोपी शुभम अनंत घाडगे व प्रतीक हरीश घाडगे हे दोघे महाड तालुक्यातील चांभारखिंड येथील रहिवासी असून तिसरा आरोपी अल्पवयीन विधीसंरक्षित आहे.

# पेणमध्ये सुशोभिकरणाबरोबर स्वच्छतेचा निर्धार

## घनकचरा व्यवस्थापनासाठी चार घंटागाड्यांचे लोकार्पण

**पेण : प्रतिनिधी**

पेण नगर परिषदेने सुशोभिकरणाबरोबरच स्वच्छतेचा निर्धार केला असून या अभियानांतर्गत रस्त्यावर स्वच्छता करणे, रस्त्यालगत असलेली गटारे स्वच्छ करण्यात आली, विद्युत पोलांवर आलेल्या झाडांच्या फांद्या कापण्यात आल्या. रस्त्यावरील बेवारस वाहन उचलण्यात आली, रस्त्यावरील टाकून दिलेले बांधकाम साहित्य व डेब्रीज उचलण्यात आले. रस्त्यावरील अनधिकृत बांधकाम हटविण्यात आले. अनाधिकृत



हातगाड्या उचलण्यात आल्या. रस्त्यावरील पोलवरील अनावश्यक वायर्स काढण्यात आल्या. रस्त्यावरील अनधिकृत बॅनर्स काढण्यात आले, नगरपरिषद मालकीच्या विद्युत पोलांना रंग देण्यात आले.

घनकचरा व्यवस्थापन रिवाईज डीपीआर अंतर्गत चार घंटागाड्यांचे लोकार्पण आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते उपविभागीय अधिकारी प्रवीण पवार, तहसिलदार स्वप्नाली डोईफोडे-जायेभाये व मुख्याधिकारी जीवन पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या वेळी माजी नगरसेवक ॲड. तेजस्विनी नेने, ज्योती अवघडे, मुस्कान झटाम, रूची महालकर, प्रिअंकी मुखर्जी तसेच नगरपालिकेचे कार्यालय अधिक्षक किरण शहा, नगर अभियंता सुहास कांबळे, आरोग्य अभियंता अंकिता इसळ, आरोग्य निरीक्षक शिवाजी चव्हाण विद्युत अभियंता रेश्मा करबेले,नगर रचनाकार विनायक बनसोडे, आबासाहेब मनाळ, प्रशांत ढवळे, उमंग कदम, महेश वडके, किशोर जाधव, गौतम मोरे, मंथन शिंदे आदी उपस्थित होते.

स्वच्छता अभियान एकूण १०० ते १२० जणांच्या मदतीने यशस्वी करण्यात आले. अभियानादरम्यान एक किमी रस्ता स्वच्छ करण्यात आला व सात टन कचरा गोळा करून घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प आंबेगाव येथे वाहतूक करण्यात आला असल्याची माहिती आरोग्य निरीक्षक शिवाजी चव्हाण यांनी या वेळी दिली.

## पावसाच्या सरींनी पनवेलकर सुखावले

**पनवेल** : गेले अनेक दिवस राज्यात पावसाने विश्रांती घेतली. दरम्यान शुक्रवारपासून मात्र पावसाने पनवेल भागात हजेरी लावली. त्यामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला आणि उकाड्यापासून दिलासा मिळाला.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यात पश्चिमी वाऱ्यांचा वेग वाढल्याने कोकण, गोवा आणि मध्य महाराष्ट्रात मध्यम ते हलक्या पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला, तसेच मंगळवारपर्यंत राज्यात हलका पाऊस पडणार आहे. दरम्यान, शुक्रवारी कोकण, मराठवाडा तसेच विदर्भात हलक्या स्वरुपाचा पाऊस झाला.

# यंदाही गणेशोत्सवासाठी धावणार मोदी एक्स्प्रेस

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईत राहणाऱ्या कोकणवासीयांना कोकणात गणेशोत्सवासाठी सुरक्षित आणि वेळेत जाता यावे यासाठी मुंबई भाजपकडून यंदाही पंतप्रधान मोदींच्या नावाने मोदी एक्स्प्रेस विशेष गाडी सोडली जाणार आहे, असे भाजप उपनगर जिल्ह्याचे पालक व कॅबिनेट मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी सांगितले.

कोकणात गणेशोत्सवासाठी जाणाऱ्या भाविकांसाठी मोदी एक्स्प्रेस ही गाडी १५ सप्टेंबर रोजी रात्री ८ वाजता दादर स्थानकातून सुटेल. ही गाडी चिपळूण, रत्नागिरी, कणकवली, कुडाळ आणि सावंतवाडी स्थानकांवर थांबेल. या गाडीचा संपूर्ण खर्च मुंबई भाजपकडून केला जाणार आहे. नोंदणीसाठी प्रत्येकी १०० रुपये शुल्क द्यावे लागेल. कोकणातील चाकरमान्यांसाठी ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्याचे लोढा यांनी सांगितले.

विभागवार नोंदणीसाठी शिवडी (९३२००५१२८१), वरळी (९२२११२३५३४), भायखळा (९८९२९८१२६१), मुंबादेवी (९८३३७७९१६७), कुलाबा (९०८२७७४९१२) व मलबार हिलसाठी (९८३३०८४७८९) या क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.


# माथेरानच्या बटाटावड्याशी जॅकीचे ऋणानुबंध; आवडत्या ठिकाणी आवर्जून दिली भेट

**कर्जत : प्रतिनिधी**

माथेरान पर्यटनस्थळाच्या प्रेमात कोण पडणार नाही, असा निसर्ग माथेरानला मिळाला आहे. वर्षातील तिन्ही ऋतूमध्ये येथील निसर्ग वेगवेगळी रूपे परिधान करुन अनेकांना आपल्या प्रेमात पाडतो. हाच निसर्ग आणि माथेरानमधील कदम टी स्टॉलमधील बटाटावडा प्रसिद्ध अभिनेते जॅकी श्रॉफ यांच्या आवडीचा बनला आहे. दरम्यान, कदम यांचा बटाटावडा आणि जॅकी श्रॉफ यांचे ऋणानुबंध गेली ४० वर्षे कायम असून, आता कदम टी स्टॉलच्या दुसऱ्या पिढीसोबतही जॅकी स्नेह जपत आहेत.

माथेरान येथे पर्यटनासाठी आलेले जॅकी श्रॉफ यांची लक्ष्मी हॉटेलचे मालक मुकेश मेहता यांची ओळख झाली. त्यानंतर मुकेश मेहता यांनी जॅकी श्रॉफ यांना घेऊन माथेरानचे आराध्य दैवत असलेल्या श्री पिसारनाथ महाराज यांच्या मंदिरात नेले. मंदिरात काही वेळानंतर जॅकी श्रॉफ हे ४० वर्षांपूर्वी मंदिराच्या समोर असलेल्या कदम टी स्टॉल या पत्र्याच्या भिंती असलेल्या चहाच्या दुकानात जाऊन बसले, मात्र या टी स्टॉलचे मालक लक्ष्मण कदम यांनी पिक्चरमध्ये दिसणाऱ्या हिरोला पाहून बटाटावडा खाण्याचा आग्रह केला. त्या दिवसापासून बटाटावड्याच्या प्रेमात अभिनेते जॅकी श्रॉफ पडले आहेत. ते कधीही माथेरानमध्ये आले की, पिसारनाथाचे दर्शन घेण्यासाठी जायचे आणि त्यानंतर कदम यांना आवाज देऊन वडापाववर ताव मारायचे, अशा पद्धतीने सुरू झालेली परंपरा आजही कायम आहे.

आज लक्ष्मण कदम या जगात नसले तरी त्यांची मुलगी मेघासोबतदेखील लहानपणापासून ऋणानुबंध झाल्याने जॅकी अगदी आपल्या कुटुंबातील व्यक्तीसारखे सर्वांची विचारपूस करीत असतात. जॅकी यांनी कदम टी स्टॉलसोबत ४० वर्षांपासून जपलेला ऋणानुबंध आजच्या धकाधकीच्या जीवनात कायम जपला असल्याचे दुर्मिळ उदाहरण यानिमित्ताने कदम कुटुंबियांनी अनुभवले. त्या वेळी जॅकीसोबत असलेल्या चार जणांनी वडे खाल्ले आणि आले घातलेला चहा घेऊन तेथून निघाले. त्यामुळे कदम ती स्टॉलमधील बटाटावडा हा त्यांच्या त्या दिवसाचा आहार होता, असे ऋणानुबंध जॅकी यांनी जपले असल्याचे त्यांचे मित्र जॅकी नजे सांगतात.



पान १ वरुन

## विरोधकांनी विकासावर बोलावे

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, हे सरकार सामान्यांकरिता काम करणारे सरकार आहे. त्यामुळे विरोधकांनी आमच्यावर पाहिजे तेवढी टीका करावी, त्या टीकेला आम्ही घाबरत नाही. 'निंदकाचे घर असावे शेजारी' असे मानणाऱ्यांपैकी आम्ही आहोत.

मीही विरोधी पक्षात होतो, विरोधी पक्षनेता होतो. वर्षानुवर्षे विरोधी पक्षात काम केले, पण ज्या वेळी सरकारवर टीका करायचो तेव्हा चांगले काय झाले पाहिजे हेही सांगायचो. यांच्याकडे मात्र ते सांगण्यासारखे काहीच नाही. हे कुठली दिशा असली पाहिजे हे सांगू शकत नाही. काय केले पाहिजे हे सांगू शकत नाही. त्यांच्याकडे बोलायला काहीच नाही. विकासाचा एकही मुद्दा त्यांच्याकडे नाही. माझे त्यांना आव्हान आहे आहे का एक तरी विकासाचा मुद्दा सांगा. फक्त बोटे दाखवून लोकांमध्ये परिवर्तन होणार नाही. जोपर्यंत हे परिवर्तन होत नाही तोपर्यंत आम्ही तिघे गप्प बसणार नाहीत, असेही उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

## रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये इन्व्हेस्टिचर सेरेमनी उत्साहात

माजी नगरसेवक प्रवीण पाटील, नेत्रा पाटील, तळोजा विभाग अध्यक्ष प्रभाकर जोशी, मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर, (सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल, उलवे) मुख्याध्यापक अविनाश कुलकर्णी (लोकनेते रामशेठ ठाकूर स्कूल, कामोठे) यांची उपस्थिती होती. सर्वांचे मुख्याध्यपिका राज अलोनी यांनी देऊन स्वागत केले. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने पालक व विद्यार्थी उपस्थित होते. या वेळी विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमात वेगवेगळ्या राज्यांमधील लोकनृत्ये सादर केली.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३मध्ये इयत्ता दहावी आणि बारावीच्या शालांत परीक्षेत उत्तुंग यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा या वेळी चषक, प्रमाणपत्र आणि रोख रक्कम देऊन या वेळी मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांना घडवणाऱ्या शिक्षकांचासुद्धा असाच सत्कार करण्यात आला, तर शाळेच्या उत्तुंग यशामध्ये मोलाचा वाटा असणाऱ्या मुख्याध्यापिका राज अलोनी यांचा लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. हा कार्यक्रम युट्युब लाईव्ह दाखवण्यात आला. त्यामुळे अनेकांनी या कार्यक्रमाचा आनंद घेतला. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# सुरांचा सच्चेपणा आणि भावनांचा अविष्कार ओंकार साधनेमुळे शक्य -डॉ. रवींद्र नामजोशी

**मुरुड : प्रतिनिधी**

संगीत सादरीकरणात रगमंचाचा देखावा, वेशभूषापेक्षाही सुरांचा सच्चेपणा आणि भावनांचा अविष्कार गायकीत असल्याशिवाय गाणे हृदयाला भिडत नसल्याचे मत शास्त्रीय संगीत विशारद डॉ. रवींद्र नामजोशी यांनी व्यक्त केले.

पै. आबीद हुसैन संगीत समारोह मंडळातर्फे मुरुड येथे आयोजित ओंकार साधना या विषयावर आयोजित कार्यक्रमात डॉ. नामजोशी शास्त्रीय संगीतात ओंकार साधनेचे महत्त्व या विषयावर मार्गदर्शन करीत होते.

ओंकार उच्चारणाने आवाज, वाणी, देह, मन व आत्मशुद्धीची प्रकिया खऱ्या अर्थानेसाकारते असे सांगुन स्वरांची उत्पत्ती, विस्तार आणि विसर्जन हे लयबद्ध होण्यासाठी प्रेरणा देणारा श्वास, कंपने, छोटे स्वर आणि श्राव्य स्वरूप आदींचा रियाझ करतांना स्वरांना दिशा मिळाली पाहिजे या कडे लक्ष वेधले. सप्तसुरांमध्ये 'सा'पक्का असला पाहिजे. त्यासाठी विशेषतः प्रातःकाळी ओंकार साधना करावी



असे आवाहन त्यांनी केले.

या वेळी शास्त्रीय संगिताचे उपासक प्रतिभा मोहिले, सिद्धेश करंबे, सुनील मोहिले, डोंगरीकर मॅडम, संतोष लखमदे, अरुण बागडे, सिद्धेश लखमदे, वैभव माळी, संदेश भोईर, सुशांत सतवीडकर, उर्मिला नामजोशी, मृदुला आबदेव, सुलभा जाधव आदी उपस्थित होते. या वेळी साधकांनी ॐ या बीज मंत्र उच्चारून ओंकार साधनेचा सरावही केला. संगीत विषयावर प्रश्नोत्तरेही झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंडळाच्या संचालिका उर्मिला नामजोशी यांनी केले.

## दोन लाख घरे निर्मितीचा म्हाडाचा संकल्प

**मुंबई** : सामान्यांसाठी राज्यात किमान दोन लाख घरे निर्मिती करण्याचा संकल्प असल्याचे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे (म्हाडा) उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जैस्वाल यांनी सांगितले. म्हाडा ही परवडणारी घरे बांधणारी संस्था असल्यामुळे सामान्यांसाठी अधिकाधिक घरे कशी निर्माण होतील, या दिशेनेच धोरण राबविले जाईल, असेही जैस्वाल यांनी स्पष्ट केले.

लोकाभिमुख प्रशासन व्यवस्था राबविण्यासही त्यांनी प्राधान्य दिले आहे. कर्मचारी-अधिकाऱ्यांच्या विविध प्रकारच्या सूचनांसाठी आपल्या कार्यालयात एक सूचना पेटीही बसविली आहे. अलिकडेच म्हाडाच्या मुंबई मंडळाने चार हजार ८२ घरांसाठी सोडत प्रक्रिया राबविली. पहिल्यांदाच कुठलाही मानवी हस्तक्षेप न होता सोडत काढण्यात आली. त्या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हाडाने घरांचा साठा वाढविण्यावर भर दिला पाहिजे, असे म्हटले होते.


**PUBLIC NOTICE**

The general public is hereby informed that My Client i.e. Mr. Sumit Bhargav Gharat., is intending to purchase the below mentioned schedule property from its owner viz. Mr. Govardhan Namdev Daur, having residential address at Dapoli, Post- Pargaov, Taluka-Panvel, District- Raigad, Panvel- 410206.

If anybody is having any objection, claim, interest, dispute, for the above intended sale transaction, he / she / they may contact the undersigned with the documentary proof substantiating his/her/ their objection / claims / details of the disputes within seven (30) Thirty days from the date of publication of this notice, falling which, My Client will proceed to complete with the sale transaction with the above owners as if there are no third party claims / objections/ disputes in respect of the schedule property and thereafter no claims/objections / disputes will be entertained.

SCHEDULE OF THE PROPERTY

All that the property i.e. Survey No. 26, Hissa No. 1/4, admeasuring 00.16.00 H. R. S. Mtr. Out of 00.25.46 H. R. S. Mtr., situated at Patnoli, Taluka-Panvel, District-Raigad, Pin code-410206, belongs to its owner Mr. Govardhan Namdev Daur.

**Sd/-**
**Adv. Priyanka N. Patil.**
**Advocate High Court.**
Office Adress: Shraddha Sneh Apt, B-101, opp. To Jakat Naka, Panvel-Uran Road, Koliwada, Panvel- 410206.
Email: aswalepriyanka30@gmail.com
Contact No.9867042996/9619965851.

# आपटा येथे विविध विकासकामांचा शुभारंभ

## आमदार महेश बालदी यांची प्रमुख उपस्थिती; ग्रामस्थांनी मानले आभार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांच्या अल्पसंख्याक विकास निधी अंतर्गत आपटा ग्रुपग्रामपंचायत येथील विविध विकासकामांचा भूमिपूजन सोहळा रविवारी (दि. २७) उत्साहात झाला. या वेळी ग्रामस्थांच्या वतीने आमदार महेश बालदी यांचे जोरदार स्वागत करण्यात आले व विकासकामांबद्दल त्यांचे आभार मानण्यात आले.



या विविध विकासकामांच्या शुभारंभाच्या वेळी माजी जिल्हा परिषद सदस्य ज्ञानेश्वर घरत, भाजपचे पनवेल तालुका उपाध्यक्ष विद्याधर जोशी, केळवणे जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष मंगेश वाकडीकर, आपटाचे सरपंच नजनिन पटेल, माजी सरपंच दत्ता पाटील, कराडे खूर्दचे माजी सरपंच विजय मुरकुटे, ताराचे उद्योगपती बाळूशेठ पाटील, भाजप नेते गणेश पाटील, साईचे माजी सरपंच विद्याधर मोकल, शिरढोणचे माजी उपसरपंच जगदीश चौधरी, ग्रामपंचायत सदस्य असद पिठू, संतोष शिंगाडे, सामाजिक कार्यकतर्रे रत्नाकर घरत, कृष्णा वाघे, दत्ता भोईर, केळवणे पंचायत समिती युवा मोर्चा अध्यक्ष सुशील ठाकूर, धर्मेंद्र भोईर, विलास ठाकूर, पांडुरंग पाटील, दस्तगीर पिठू फैसल, पिठू सिराज काझी, बशीर मुल्ला, नासिर मुल्ला, साजिद मुल्ला, नादिर मुल्ला, फैज बुबेरे, अल्तमश मुल्ला, तास्किर मुल्ला, अर्सलान दळवी, खालिद पिठू, फरहान पिठू, झिशान नवीद जलगावकर, खलील मुल्ला, अमित पाटील, ताराचे दिनेश पाटील, ज्ञानेश्वर भोईर यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते. सुमारे ३५ लाखांच्या विकासकामांचा शुभारंभ करण्यात आला. यामध्ये आपटा मोहल्ला येथील रस्ते काँक्रीटीकरण करणे (२० लाख रुपये), मस्जिद ते बाजारपेठकडे जाणारा रस्ता काँक्रेटीकरण करणे (१० लाख रुपये), दर्गाकडे जाणारा रस्ता काँक्रेटीकरण करणे (पाच लाख रुपये), आपटा सारसई बागेचीवाडी (आदर्शवाडी) घरकुलचे भूमिपूजन करण्यात आले.





# आर्थिक फसवणूक करणारे दाम्पत्य पोलिसांच्या जाळ्यात

## पती-पत्नीची बंटी आणि बबलीसारखी कार्यप्रणाली

**पनवेल : वार्ताहर**

आर्थिक फसवणुकीच्या अनेक गुन्ह्यांमध्ये विविध पोलीस स्थानकांमध्ये गुन्हे दाखल असलेले दाम्पत्य अखेरीस पोलिसांच्या ताब्यात आले आहे. शुक्रवारी (दि. २५) त्यांना पनवेल न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.



**कोर्टाने ठोठावली १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी**

राजू देशपांडे आणि संगिता देशपांडे असे या दाम्पत्याचे नाव असून २०१६ सालच्या आर्थिक फसवणूक आणि अनुसूचित जाती आणि जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम १९८९ प्रकरणानुसार त्यांच्यावर तक्रार दाखल आहे. तक्रारदार नितीन कांबळे यांनी पनवेल शहर पोलीस स्थानकात दाखल केलेल्या तक्रारीनुसार देशपांडे पती-पत्नीला पनवेल पोलिसांनी बुधवारी ताब्यात घेतले. त्यांना न्यायालयात हजर केले असता २५ ऑगस्टपर्यंत कोठडी बजावण्यात आली. पुनश्च कोर्टात सादर केले असता त्यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी ठोठावण्यात आली आहे.

नितीन कांबळे यांना गाळा भाड्याने देण्यासाठी संगीता देशपांडे यांनी डिपोझिटपोटी एक लाख २५ हजार घेऊनही गाळा दिला नाही. अनेकदा विनंती करूनही पैसे परत करण्यास संगीता देशपांडे, राजू देशपांडे आणि एजंट इमरान इस्माईल अन्सारी यांनी टाळाटाळ केली. गाळा देत नसाल तर माझे पैसे परत करा, अशी विनवणी करण्यासाठी गेलेल्या नितीन कांबळे यास देशपांडे पती-पत्नीने जातीवाचक शिविगाळ केली.

ज्या व्यावसायिक संकुलात वाद निर्माण झाला त्या ठिकाणी कोणतेही नोंदणीकृत दस्तावेज नसताना या दांपत्याने अनेक गाळे भाड्याने देऊन पैसे लुबाडल्याचे सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. संकुलातील चेअरमन सेक्रेटरी व अन्य पदाधिकाऱ्यांनी दांपत्याविरोधात तक्रार केल्याचे समजते. देशपांडे पती-पत्नीविरोधात खांदेश्वर पोलीस ठाणे, खारघर पोलीस ठाणे, पनवेल शहर पोलीस ठाणे, एनआरआय पोलीस ठाणे, वर्सोवा पोलीस ठाणे, बीड जिल्ह्यातील आंबेजोगाई सिटी पोलीस ठाणे, लातूर जिल्ह्यातील शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे गुन्हे दाखल आहेत.

# खारघर येथील तलावात आढळलेला मृतदेह कस्टम अधिकाऱ्याचा

## नैराश्यातून आत्महत्या केल्याचा अंदाज

**पनवेल : वार्ताहर**

न्हावाशेवा येथील जवाहरलाल नेहरु कस्टम हाऊसच्या बॉन्ड सेक्शनमध्ये सुरू असलेल्या भ्रष्ट कारभाराची सीबीआयने तपासणी करून या विभागातील कस्टम अधिकारी आणि इतरांवर गुन्हा दाखल केला आहे. यानंतर तणावाखाली आलेल्या कस्टमच्या बॉन्ड विभागातील अधीक्षक मयंक सिंग यांनी खारघरमधील तळोजा जेलसमोरील तलावात उडी टाकून आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे.

शुक्रवारी (दि. २५) सकाळी त्यांचा मृतदेह येथील तलावात सापडल्यानंतर प्रकार उघडकीस आला. गत आठवड्यात सीबीआयने मयंक सिंग यांच्यावर गुन्हा दाखल करून त्यांच्या खारघर तसेच मूळ गावातील घराची झडती घेतली होती, तसेच सीतापूर, गोरेगाव आणि ठाणे येथील घरावर छापेदेखील मारले होते. या सर्व प्रकारामुळे अधीक्षक मयंक सिंग तणावाखाली आले होते. त्यामुळे गुरुवारी मयांक सिंग यांनी रात्रीच्या सुमारास तळोजा येथील कारागृहासमोरील तलावामध्ये उडी टाकून आत्महत्या केली.

मयांक सिंग यांनी आत्महत्येपूर्वी लिहून ठेवलेली चिठ्ठी त्यांच्या गाडीमध्ये सापडली असून त्यात त्यांनी कस्टम विभागातील काही अधिकाऱ्यांची नावे लिहिल्याचे समजते. खारघर पोलिसांकडून पुढील तपास करण्यात येत आहे.

# कुष्ठपीडित संघटनेचा प्रमाणपत्र प्रकाशन सोहळा



**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट कुष्ठपीडित संघटनेच्या वतीने १२ ए+८०जी प्रमाणपत्र प्रकाशन सोहळा इच्छापूर्ती गणेश मंदिर येथे झाला.

महाराष्ट्र कुष्ठपीडित संघटनेच्या वतीने आयोजित कार्यक्रमात पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक व महाराष्ट्र कुष्ठपीडित संघटनेचे सल्लगार ॲड. मनोज भुजबळ, विरोधी पक्षनेता पिंपरी चिंचवड महानगरपालिका राजेंद्र काटे, आरोग्य राज्यस्तरीय समितीचे उदय ठक्कर, महाराष्ट्र कुष्ठपीडित संघटनेचे अध्यक्ष भूपाल फिरंगाणे, उपाध्यक्ष जितेंद्र चव्हाण, सचिव अशोक आंबेकर, उपसचिव संतोष गाडेकर, खजिनदार शफी शेख, अँपल स्टेट लीडर रसूल मुल्ला, लहू सावंत आदींसह सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चिटफंड घोटाळाप्रकरणी गुंतवणूकदारांचा पिरकोन गावात उद्रेक

**उरण : प्रतिनिधी**

चिटफंड घोटाळा प्रकरणी उरण, पनवेलसह इतर तालुक्यातील हजारो गुंतवणूकदारांची सतीश गावंड व सुप्रिया पाटील यांनी मोठ्या प्रमाणात आर्थिक फसवणूक केली आहे. अशा गुंतवणूकदारांना राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मध्यस्थीने पैसे मिळवून देण्यासाठी सारडे गावातील शिवसेनेचे कार्यकर्ते रुपेश पाटील यांनी रविवारी (दि. २७) पिरकोन येथे सभेचे आयोजन केले होते. या वेळी फसवणूक झालेल्या गुंतवणूकदारांमध्ये एकच उद्रेक निर्माण होत असल्याचे चित्र पहावयास मिळाले.



उरण परिसरात चिटफंड योजनेत झटपट श्रीमंत होण्याच्या आशेने हजारोंच्या संख्येने नागरिकांनी आपली जमापुंजी पिरकोन गावातील सतिश गावंड व कोप्रोली गावातील सुप्रिया पाटील यांच्याकडे एंजटच्या मदतीने पैसे गुंतवले. त्यामध्ये गुंतवणूकदारांची मोठ्या प्रमाणात आर्थिक फसवणूक झाली असून हे प्रकरण न्यायप्रविष्ट झाले आहे. अशा गुंतवणूकदारांना राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मध्यस्थीने पैसे मिळवून देण्यासाठी सारडे गावातील सामाजिक कार्यकर्ते तथा शिवसेनेचे कार्यकर्ते रुपेश पाटील यांनी सभेचे आयोजन केले होते.

सभेत आर्थिक फसवणूक झालेल्या गुंतवणूकदारांचा उद्रेक झाला. उरण सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदीश देवरे यांचा ताफा तैनात करण्यात आला होता. याशिवाय पिरकोन गावातील सामाजिक कार्यकर्ते मुकुंद गावंड, अनिल पाटील, कृष्णा पाटील हे सातत्याने प्रयत्न करीत होते.

## निवडक

### पांडवकड्यावर अल्पवयीन मुलाचा मृत्यू

**पनवेल** : खारघर येथील पांडवकडा या धबधब्याच्या ठिकाणी आपल्या मित्रांसह वर्षासहलीसाठी गेलेल्या अल्पवयीन मुलाचा बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. खारघर येथील राहणारे अल्पवयीन सहा मुले चोरवाटेने या ठिकाणी गेले होते. वर्षासहलीचा आनंद आपल्या मित्रासह घेते असताना त्यातील १३ वर्षीय हर्ष मिश्राचा तेथील दुर्घटनेत मृत्यू झाला आहे, तर त्याचे उर्वरित पाच मित्र सुरक्षित असल्याचे समजते. या घटनेची माहिती खारघर पोलिसांना मिळताच त्यांच्यासह अग्निशामक दलाचे पथक व रेस्क्यू टीम तेथे पोहचली व त्यांनी हर्षचा मृतदेह त्या ठिकाणाहून शोधून काढला आहे. या घटनेची नोंद खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### ई-होमिओपॅथी चिकित्सालयाचे उद्घाटन

**उरण** : आरोग्यम् धनसंपदा संस्कृतमध्ये सुवचन आहे. माणसाचे आरोग्य हे सुस्थितीमध्ये असेल तर माणूस हा प्रत्येक परिस्थितीला सामोरे जात असतो आणि हेच आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी डॉ. हिराचंद पाटील यांनी नंदाई प्रतिष्ठान, वशेणीतर्फे श्री नंदाई केअर क्लिनिक आणि ई-होमिओपॅथी चिकित्सालयाच्या दुसऱ्या युनिटची स्थापना करण्यात आली. त्याचे उद्घाटन पनवेल मनपाचे माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी डॉ. विलासराव भालेराव मुंबई हे कन्सल्टंट, डॉ. निकुंभ, मनीषा मॅडम तसेच केंद्रप्रमुख उर्मिला म्हात्रे मॅडम, रमेश म्हात्रे, सारडे विकास मंच अध्यक्ष नागेंद्र म्हात्रे, सुयश क्लासेस आवरे अध्यक्ष निवास गावंड, हरिश्चंद्र म्हात्रे, रामनाथ पाटील, त्रिजन पाटील, सिद्धार्थ ठाकुर, जगदिश पाटील, निखिल पाटील, आदित्य पाटील उपस्थित होते.



# पनवेलमध्ये रंगली एकपात्री, द्विपात्री नाट्यस्पर्धेची अंतिम फेरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रंगमंचावर एकटा असूनही प्रेक्षकांना खिळवून ठेवणारा कलाकार हा ताकदीचा मानला जातो. एकपात्री किंवा द्विपात्री नाट्य सादर करताना कलाकाराचा अभिनय लक्षवेधी असावा लागतो. अशाच कलाकारांच्या अभिनयाची कसोटी पाहण्यासाठी आणि त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा पुरस्कृत भाजप सांस्कृतिक सेल उत्तर रायगडच्या वतीने एकपात्री व द्विपात्री अभिनय स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेचे उद्घाटन अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे उपाध्यक्ष तथा पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते आणि कल्पना कोठारी यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी (दि. २७) करण्यात आले.









यंदाचे या स्पर्धेचे चौथे वर्ष आहे. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल दरवर्षी वेगवेगळ्या नाट्यस्पर्धांचे आयोजन करतात. रंगमंच आमचा कलाविष्कार तुमचा असे म्हणत अटल करंडक एकांकिका स्पर्धा, मायबोली एकपात्री अभिनय स्पर्धा, एकपात्री आणि द्विपात्री अभिनय स्पर्धांचे आयोजन केले जाते आणि कलाकारांच्या अविष्काराला दाद दिली जाते. या स्पर्धा राज्यस्तरीय पातळीवर होतात. महाराष्ट्राच्या अनेक जिल्ह्यांतून वेगवेगळ्या नाट्यसंस्था यात सहभागी होतात.

मयुरेश नेतकर, कल्पना कोठारी, माजी नगरसेविका दर्शना भोईर, शाम फुंडे, अनिल भगत, अमरीश मोकल, चिन्मय समेळ, पर्यवेक्षक अंकित म्हात्रे, संदीप रेडकर, अभिषेक पटवर्धन, अमोल खैर, गणेश जगताप, वैभव बुवा, निखिल गोरे यांच्यसह इतर मान्यवर आणि पदाधिकारी उपस्थित होते.

# गुळसुंदेतील पेशवेकालीन स्वयंभू श्री सिद्धेश्वर मंदिर

**रसायनी : बातमीदार**

श्रावण महिना म्हटले की, शिवशंभोच्या दर्शनासाठी मंदीरात रांगा लागतात. सणांच्या, व्रतवैकल्यांच्या या महिन्यात भक्तांना मंदिराची ओढ असते. ग्रामीण भागातही श्रावणी सोमवारी भक्तांची मंदिरात गर्दी होते. त्यातीलच एक म्हणजे रसायनी परिसरातील पाताळगंगा नदीकिनारी असलेले पेशवेकालीन स्वयंभू श्री सिद्धेश्वराचे गुळसुंदे गावातील प्राचीन मंदिर.





काळ्या पाषाणातील हे सुंदर मंदिर हेमाडपंथी दक्षिण शैलीत पूर्ण चुन्यामध्ये बांधलेले आहे. भव्य घुमट, सभामंडप, आंतर भागात, शिल्प, चौकटीवर वेलपत्ती, कमलाकारांची संकल्परचना, भिंतीत समई दिपासाठी महिरपी कोनाडे, नंदीशिल्प, बाहेरील पायऱ्यांजवळ यादव विजयाची प्रतिकरूप हत्ती शिल्पे, समोरून वाहणारी पाताळगंगा नदी, मंदिरासमोर भव्य घाट व पाताळगंगा नदीचा रमणीय दिसणारा देखावा. यामुळे येथे येणाऱ्या प्रत्येकाचे मन प्रसन्न होते. या मंदिरातील रचनेत यादवांच्या विजयाची गोष्ट दडली असल्याने इतिहासप्रेमी कायम येथे भेटी देत असतात.

हे मंदिर पनवेल तालुक्यात गुळसुंदे गावी आहे. महाशिवरात्रीला येथे मोठी यात्रा भरते. पुणे, मुंबई, ठाणे, डोंबिवली येथे राहाणारे गावचे नागरिक महाशिवत्रीला गावी येतात.

मंदिराला उत्पन्नाचे इतर स्रोत नाहीत. भक्तांनी दिलेल्या दक्षिणेतूनच मंदिराचा जीर्णोद्धार व सोयी केल्या जातात.

# जेएनपीटी-करळ मार्गावर कंटेनर उलटला

**उरण : प्रतिनिधी**

जेएनपीटी बंदराला जोडणाऱ्या जेएनपीटी ते करळ दरम्यानच्या मार्गावर शनिवारी (दि. २६) कंटेनरचा अपघात झाला. या मार्गावरील रस्त्यांच्या काँक्रीटीकरणाचे काम सुरू आहे. या खड्ड्यांची सूचना देण्यासाठी बॅरिकेड्स लावण्यात आले होते, मात्र कंटेनरमधील वजनी समान कलंडल्याने अपघात झाला. सुदैवाने या अपघातात कोणीही जखमी झालेला नाही.



जेएनपीटी बंदराला जोडणाऱ्या मार्गाचे काँक्रीटीकरण सुरू आहे. त्यासाठी अनेक ठिकाणी खड्डे खोदण्यात आले आहेत.

या खड्ड्यांची सूचना देण्यासाठी बॅरिकेड्स लावण्यात आले होते. त्याकडे दुर्लक्ष करीत वाहन आल्याने हा अपघात झाल्याची शक्यता प्रत्यक्षदर्शीनी व्यक्त केली आहे.

## संपादकीय

# विरोधकांची कोल्हेकुई

राज्यात भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी या तीन पक्षांचे मजबूत सरकार दमदार कामगिरी करीत आहे. विकासाच्या योजना, प्रकल्प, निर्णय या सरकारकडून मार्गी लागून सर्वसामान्यांना दिलासा मिळू लागला आहे. शासन आपल्या दारी या अभिनव उपक्रमातून तर सरकार थेट जनतेपर्यंत पोहचत असून विविध घटकांना निरनिराळ्या प्रकारचे लाभ दिले जात आहेत. हे बघवत नसल्याने विकासाला विरोध असलेले विरोधक सत्ताधाऱ्यांच्या नावाने बोंबा मारत आहेत.

**राज्यात गेल्या वर्षी सत्तापरिवर्तन होऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली मजबूत सरकार अस्तित्वात आले. तत्कालीन मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या निष्क्रिय व मनमानी कारभाराला कंटाळून वरिष्ठ नेते एकनाथ शिंदे व सहकारी आमदारांनी उठाव केला. ग्रास रूटवर काम करणाऱ्या शिंदेंनी सहकाऱ्यांना सोबत घेऊन ठाकरेंना शह देत भाजपच्या पाठबळाने नवे सरकार स्थापन केले. भाजप नेते व विद्यमान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. या सरकारला एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर राष्ट्रवादीचे बडे नेते अजित पवार सरकारमध्ये दाखल होऊन उपमुख्यमंत्री झाले. आता तीन पक्षांचे भक्कम सरकार जनतेसाठी कार्यरत आहे. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री असे तिन्ही नेते अनुभवी, अभ्यासू आणि परिश्रम घेणारे असल्याने मागील सरकारच्या काळात रखडलेल्या कामांचा बॅकलॉग भरून काढणे सध्या मोठ्या प्रमाणात सुरू आहे. चांद्यापासून बांद्यापर्यंत सरकार पोहचत असून शक्य होईल ते सर्वकाही जनतेला देण्याचा प्रयत्न केला जात आहे. मुख्य म्हणजे या सरकारला देशातील मोदी सरकारचे मार्गदर्शन आणि पाठबळ मिळत असल्याने विकासाची गाडी सुसाट पुढे जाताना दिसत आहे. त्यामुळे विरोधक मात्र भरकटू लागले आहेत. क्रियाशील असलेल्या सरकारवर उठसूट टीका करण्याचा एककलमी कार्यक्रम त्यांनी हाती घेतला आहे. मोगलांना जसे संताजी, धनाजी हे जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी दिसत असत तसे आता विरोधकांना मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री दिसत आहेत. त्यांच्यावर वारेमाप टीका आणि एकूणच सरकारवर बेछूट आरोप विरोधी पक्षातील नेतेमंडळी करताना पहावयास मिळत आहे. खरेतर हे त्यांचे अपयश आहे. वास्तविक स्वत:चे सरकार असताना त्यांनी विकासासाठी प्रयत्न केले पाहिजे होते, पण इच्छाशक्ती व आपापसात ताळमेळ नसल्याने एकमेकाला सावरण्याखेरिज ते काहीएक करू शकले नाही. कोरोना काळात व त्यानंतरही तेव्हाचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे घरात बसून असत. मग इतरांना त्यांच्यापासून काय प्रेरणा मिळणार? शेवटी व्हायचे तेच झाले. सत्ता गेल्याने आलेल्या नैराश्यातून ही मंडळी आता भोंग्यासारखी बोंबलत आहेत. स्वत: काही करायचे नाही आणि दुसरा काही करीत असेल तर त्यावर टीका करायची यातून काय साध्य होणार हे त्यांनाच माहीत, पण जनता सुज्ञ आहे. दोन सरकारमधील फरक त्यांना चांगलाच कळतो. त्यामुळे विरोधकांनी कितीही कोल्हेकुई केली तरी सरकारला काही फरक पडणार नाही. त्रिशूळ सरकार अधिक जोमाने काम करणार आणि राज्याला विकास व प्रगतीच्या दिशेने नेणार हे काही वेगळे सांगायला नको. त्यामुळे विरोधकांनी टीका करण्याऐवजी आपण कुठे चुकलो याचे आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे; अन्यथा आता आहे तेवढेही त्यांचे अस्तित्व भविष्यात उरणार नाही.**

# कमी पर्जन्यामुळे कर्जतमध्ये पाण्यासाठी वणवण

यंदा कमी पाऊस पडल्याने कर्जत तालुक्यात काही आदिवासी भगिनींना हंडाभर पाण्यासाठी विहिरींवर मुक्काम करण्याची वेळ येत आहे. तालुक्यात योजनांचा सुकाळ आहे, पण नियोजनांचा दुष्काळ असल्याने महिलांवर ही वेळ आली आहे. जल जीवन मिशनच्या माध्यमातून तालुक्याच्या दुर्गम भागात १२९ योजनांचे काम सुरू आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील पाणीटंचाई दूर होईल असे वाटते.

कर्जत नगरपरिषद स्थापन होऊन ३० वर्षे होऊन गेली. पाणी योजनांचे राजकारण २२ वर्ष चालले होते. त्यातून सुटका झाल्यानंतर कर्जत शहरासाठी पाणी योजना नव्याने करण्यात आली. पाण्याची मुबलक उपलब्धता झाल्याने कर्जतचा विकास अपेक्षेपेक्षा दुप्पट वेगाने झाल्याने सध्या सुरू असलेली पाणी योजना कमी पडत आहे. या शहरासाठी नवीन पाणी योजना करणे गरजेचे आहे.

कर्जत ग्रामपंचायत असताना पळसदरी तलावाच्या की पेज नदीच्या पाण्यावर पाणी योजना करायची? असा प्रश्न निर्माण झाला होता. त्या वेळी राजकीय पक्षांमध्ये प्रचंड मतभेद होते. अगदी आंदोलने, उपोषणे झाली. अखेर सरकारी दरबारी जाऊन त्यावर तोडगा काढण्यात आला व १९ गावांसाठी पेज नदीची योजना व कर्जत ग्रुप ग्रामपंचायतील कर्जत, मुद्रे (बुद्रुक ), मुद्रे (खुर्द), भिसेगाव व गुंडगे या गावांसाठी पळसदरी या रेल्वेच्या पाण्यावर योजना करण्याची मंजुरी देण्यात आली. या योजनेचे पाणी ग्रामपंचायातीतील गावांना पुरेसे पडत नव्हते. त्यामुळे विकसक कर्जतला फिरकत नसत. या पाण्याच्या नळाद्वारे कधी छोटे छोटे मासे, तर कधी लहान वांबीपण नळाद्वारे आल्याचा अनुभव अनेक ग्रामस्थांना त्या वेळी आला होता.

पाणी योजना मंजूर झाली होती. सात टक्के कामही झाले, मात्र १९९९ साली राज्यात सत्ता बदल झाल्याने नवीन सरकारच्या धोरणामुळे या योजनेचे काम पुन्हा सुरू झाले नाही. २००० साली एका वृत्तपत्राच्या प्रतिनिधीने ही २२ वर्षांची रखडलेली पाणी योजना प्रत्यक्षात आणण्याचे ठरविले आणि त्याने कर्जतच्या नागरिकांना बरोबर घेऊन तीन-चार पाणी मेळावे घेतले. यामध्ये एकमेकांची तोंडे न बघणाऱ्या लोकप्रतिनिधी व राजकीय पक्षांच्या नेत्यांना एकत्रित बोलवून हे तिन्ही मेळावे यशस्वी झाले. या जनरेट्याने सरकार दरबारी दखल घेण्यात आली आणि पाणी योजनेचे काम पुन्हा सुरू झाले. ही योजना पूर्ण व्हावी म्हणून वृत्तपत्र प्रतिनिधीने तब्बल सात वर्षे पाठपुरावा केला. २००६-०७ साली योजना पूर्ण झाली. या योजनेचे पाणी कर्जतमध्ये आल्यावर विजयी पाणी मेळावा करून ज्यांनी ज्यांनी सहकार्य केले त्यांचे ऋण व्यक्त करण्यात आले. या योजनेचे पाणी घरोघरी सुरू झाले, मात्र अद्याप या योजनेचे उद्‌घाटन झाले नाही ही एक ऐतिहासिक बाब म्हणावी लागेल.

कर्जतकरांना पुरेसे व स्वच्छ पाणी मिळू लागल्याने विकसक कर्जतकडे येऊ लागल्याने कर्जतचा विकास होऊ लागला तो इतक्या झपाट्याने झाला की २०३१ सालापर्यंत असलेली ही पाणी योजना २०२१ सालापासूनच अपुरी पडू लागली. आता तर टोकाच्या भागाला पाणीच मिळत नाही. त्यामुळे अनेकांनी पाणी येण्यासाठी पंप लावले. त्यामुळे ज्यांनी पंप लावले नाहीत त्यांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. काहींनी तर नळ जोडणी घेताना नगर परिषदेचे कर्मचारी न आणता आपल्या मर्जीतील खाजगी प्लम्बर आणून हवा तशा नियमबाह्य जोडण्या घेऊन पाणी घेतले आहे. त्यामुळे अन्य नागरिकांनी पंप लावूनही त्यांना पाणी मिळत नाही. याबाबत नगर परिषदेमध्ये तक्रारी अर्ज देऊनही अधिकाऱ्यांकडून अद्याप कारवाई करण्यात आली नाही.

कर्जत नगरपरिषद हद्दीसाठी नवीन पाणी योजना मंजूर झाली पाहिजे यासाठी आमदार महेंद्र थोरवे यांनी प्रयत्न सुरू केले आहेत. सुमारे ७० कोटी रुपयांचे अंदाजपत्रक या योजनेचे आहे. ते कधी मंजूर होईल याकडे कर्जतच्या नागरिकांचे लक्ष लागून राहिले आहे.

**खबरबात**
**विजय मांडे**

सध्या जे पाणी मिळते त्याचा नियमितपणा नाही. कधी सकाळी ८ वाजता, तर कधी रात्री ८ वाजता पाणी मिळते. जेथून पाणी उचलले जाते तेथील वीजपुरवठा खंडित होत असतो अशी कारणे सांगितली जातात. नगर परिषदेने यावर उपाय म्हणून जनरेटरसुद्धा घेतले आहे, पण डिझेल परवडत नाही म्हणून त्याचा वापर करण्यात येत नाही. त्यामुळे नागरिकांना नेहमीच त्रास सहन करावा लागत आहे. त्यातच पाणी योजना जुनी झाल्याने पेज नदीवरून आलेल्या जलवाहिन्या तसेच शहरात विभागा विभागात असलेल्या जलवाहिन्या नेहमी फुटत असतात. त्यामुळेही पाणीपुरवठा खंडित होत असतो.

कर्जत तालुक्याच्या ग्रामीण भागाचे म्हणायचे झाले तर तालुक्यात सर्वांत मोठी आदिवासी वाडी असलेल्या ताडवाडीमध्ये भीषण पाणीटंचाई नेहमीच असते. शासनाकडून ताडवाडीमध्ये पाण्याच्या टँकरने पाणीपुरवठा केला जातो, मात्र हा पुरवठा देखील तोकडा पडत असल्याने आता महिलांवर विहिरीवर झोपून रात्र काढण्याची वेळ येते. येथील महिला पाण्याच्या एका हंड्यासाठी रात्र विहिरीवर झोपून काढत असतात. शासनाकडून मंजूर पाणी योजनेचे अद्यापदेखील काम अपूर्ण असल्याने पाणी योजनेच्या पाण्याला प्रतीक्षेची किनार आहे.

कर्जत तालुका हा आदिवासीबहुल तालुका म्हणून ओळखला जातो. तालुक्यातील डोंगर, दुर्गम भाग असलेल्या परिसरात उन्हाळ्यात पाणी टंचाईची झळ बसते. तालुक्यातील पाथरज ग्रामपंचायत हद्दीत ताडवाडी आदिवासी वाडी येते. तालुक्यातील सगळ्यात मोठी ही आदिवासी वाडी असून सुमारे ९०० लोकसंख्या असलेल्या या वाडीत २५०च्यावर कुटुंब राहतात. पाणीटंचाईची झळ सध्या या वाडीला बसत असते. दरवर्षी प्रशासनाकडून पाणीटंचाई कृती आराखडा तयार केला जातो, मात्र तरीही पाणीपुरवठा तोकडा पडत असल्याची खंत ताडवाडी ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. उन्हाळ्यात पाणीटंचाई तीव्र असते. ताडवाडी येथील आदिवासी लोकांचे पाण्यासाठी हाल असतात. ताडवाडी आणि मोरेवाडी येथील आदिवासी लोकांसाठी नळपाणी योजना राबविण्याचा निर्णय झाला असून योजनेचे काम सुरु आहे., मात्र काम लांबणीवर जात आहे. दरम्यान, निर्माण झालेली पाणीटंचाईमुळे येथील महिलांना रात्री विहिरीवर झोपून काढावी लागत असल्याचे भीषण वास्तव समोर आले आहे.

शासनाकडून जलजीवन मिशन अंतर्गत ताडवाडी मोरेवाडी येथे पाणी योजना राबवली जात आहे. एक कोटी ३३ लाख ४२ हजार २९६ रुपये मंजूर करत मे २०२२मध्ये या कामाचे कार्यरंभ आदेश ठेकेदाराला देण्यात आले होते, तर या मे महिन्यामध्ये हि योजना कार्यान्वित होण्याचे संकेत असताना अद्यापही योजनेचे काम अपूर्ण आहे. त्यामुळे आशा लावून बसलेल्या ताडवाडी मोरेवाडी मधील ग्रामस्थांना या योजनेचे पाणी मिळाले नाही, मात्र त्यांच्या डोळ्यात पाणीटंचाईच्या झळांनी पाणी उभे राहिले आहे. तेव्हा या शासकीय योजनेला पाझर फुटणार केव्हा तरी, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

कर्जत तालुक्यात जल जीवन मिशनच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात पाणीटंचाईवर मत करण्याचा प्रयत्न केला जात आहे, मात्र यामध्ये ठेकेदारांचा संथ कारभार तर प्रशासनाच्या नियोजनाचा अभाव यामुळे पाणीटंचाई भागातील नागरिकांसाठी जल खऱ्या अर्थाने जीवन ठरण्यास अडथळा ठरत आहे. पेठ येथे जलजीवन योजनेच्या माध्यमातून सुरु असलेल्या कामामध्ये विहिरीला पाणीच लागले नसल्याने प्रशासनाकडून काम थांबवण्यात आले आहे, तर योजना संकटात सापडू नये म्हणून खोदलेली विहीर पाणीसाठ्यासाठी आम्हाला नीट बांधून द्या अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. एकंदरीत ग्रामीण भागाबरोबरच शहरातसुद्धा पाणी टंचाई आहे. सुरू असलेल्या पाणी योजना पूर्ण झाल्यावर ग्रामीण भाग टंचाईमुक्त होईल, पण कर्जत शहरासाठी नवीन पाणी योजना मंजूर होऊन पूर्ण झाल्यास पुरेसे पाणी शहरवासीयांना मिळेल.

यंदा आतापर्यंतची आकडेवारी पाहता पर्जन्यमान कमी झाले आहे. पाऊस चांगल्या प्रमाणात पडल्यास पाणीटंचाईची झळ बसत नाही, पण पाऊस समाधानकारक पडत नसल्याने नागरिकांच्या तोंडचे पाणी पळाले आहे.



## बदलते तंत्रज्ञान

# व्हॉट्सॲपमध्ये आता नावाशिवाय ग्रुप होणार

व्हॉट्सॲपची मूळ कंपनी मेटा आणि मेटाचे सीईओ मार्क झुकरबर्ग आहेत. झुकरबर्ग यांनी व्हॉट्सॲपसाठी एका नवीन फीचरची घोषणा केली आहे. या फीचरच्या मदतीने वापरकर्त्यांना कोणतेही नाव प्रविष्ट न करता ग्रुप तयार करण्याची परवानगी देते. जेव्हा कधी तुम्ही घाईत असाल आणि ग्रुपला नाव देण्यासाठी वेळ नसेल तेव्हा हे फिचर कमी येईल असे झुकरबर्ग यांनी म्हटले आहे.



व्हॉट्सॲप हे स्पष्ट करते की हे फिचर वापरकर्त्यांच्या गोपनीयतेचेदेखील संरक्षण करते. ग्रुपमध्ये असणाऱ्या प्रत्येक मेंबरला ग्रुपचे नाव वेगवेगळे दिसणार आहे. प्रत्येकाने आपल्या संपकरत असणाऱ्या व्यक्तीनेच नाव काय सेव्ह केले आहे त्या आधारावर ती नावे दिसणार आहेत. तुमचा संपर्क नसलेल्या ग्रुपमध्ये तुम्हाला जोडल्यास त्यांना फक्त तुमचा फोन नंबर दिसणार आहे.

नाव न देता ग्रुप तयार करता येणारे फिचर लवकरच येत्या आठवड्यात प्रत्येकासाठी उपलब्ध होणार आहे. यासाठी तुम्हाला काही काळ प्रतीक्षा करावी लागणार आहे. व्हॉट्सॲपने गेल्या कधी दिवसांमध्ये आपल्या वापरकर्त्यांसाठी अनेक नवीन फीचर्स आणली आहेत. ज्याच्या मदतीने वापरकर्ते प्लॅटफॉर्म वापरताना चांगला अनुभव घेऊ शकतात.

व्हॉट्सॲपच्या नवीन अपडेटकडे लक्ष ठेवणाऱ्या WABetaInfoच्या अहवालानुसार 'एचडी फोटो' हे फिचर आणले आहे. हे फिचर iOS आणि अँड्रॉइड या दोन्ही वापरकर्त्यांसाठी लॉन्च करण्यात आले आहे. याआधी फोटो पाठवताना त्याची साईझ किंवा क्वालिटी कंप्रेस होत असे, मात्र या फीचरच्या मदतीने तुम्ही पाठवलेले फोटो एचडीक्वालिटीमध्येच समोरच्याला दिसणार आहे तसेच मेटा कंपनीदेखील व्हॉट्सॲपवर एचडी व्हिडीओ शेअरिंग फिचर आणण्यासाठी काम करत आहे.

व्हॉट्सॲपने एक नवीन फिचर लॉन्च केले आहे, जे वापरकर्त्यांना त्यांच्या चॅटमध्ये लहान आकाराचे व्हिडीओ मेसेज सेंड आणि रिसिव्ह करण्यास परवानगी देते. कंपनीने instant video हे फिचर लॉन्च केले आहे. हे इन्स्टंट व्हिडीओ मेसेज हे व्हॉइस मेसेजसारखेच असतात. व्हिडीओ मोडवर स्विच करण्यासाठी वापरकर्ते टेक्स्ट फिल्डच्या उजव्या बाजूला असलेल्या आयकॉनवर क्लिक करू शकतात तसेच त्यानंतर ते ६० सेकंद इतक्या वेळेचा व्हिडीओ शेअर करू शकतात.

# मराठी कथाकार व्यंकटेश माडगूळकर

व्यंकटेश दिगंबर माडगूळकर हे मराठी लेखक आणि चित्रकार होते. त्यांनी कथा, कादंबऱ्या, प्रवासवर्णनांसह चित्रपटांसाठी पटकथाही लिहिल्या. व्यंकटेश माडगूळकर यांना शिकारीचा छंद होता.त्यांनी काही पुस्तके त्यांच्या जंगल भ्रमंतीच्या अनुभवांवर लिहिली आहेत. आज त्यांचा स्मृतीदिन आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया त्यांच्याविषयी या लेखातून...



**निमित्त**

व्यंकटेश दिगंबर माडगूळकर हे श्रेष्ठ मराठी कथाकार आणि कादंबरीकार होते. त्यांचा जन्म ६ जुलै १९२७ रोजी सांगलीतील माडगूळ या ठिकाणी झाला. औपचारिक शिक्षण मॅट्रिकपर्यंतही झाले नाही. तथापि स्वप्रयत्नाने वाङ्मयाचा व्यासंग केला. इंग्रजी शिकून पाश्चात्त्य साहित्याचेही वाचन केले. आरंभी काही काळ पत्रकारिता केल्यानंतर ते १९५० च्या सुमारास मुंबईस आले आणि मराठी चित्रसृष्टीत पटकथालेखन करू लागले. तत्पूर्वी माणदेशी माणसे (१९४९) हा त्यांचा कथासंग्रह प्रसिद्ध झाला होता. त्यातील व्यक्तिरेखांतून त्यांनी ग्रामीण माणसाचे जे अस्सल आणि जिवंत दर्शन घडविले, ते तोवरच्या मराठी साहित्याला अनोखे होते. अद्‌भूतता, स्वप्नरंजन, कल्पनारम्यता यांच्या पकडीतून सुटलेल्या वास्तववादी ग्रामीण साहित्यकृतींचा आरंभ त्यांच्या या कथासंग्रहापासून झाला. त्यानंतर 'गावाकडच्या गोष्टी' (१९५१), 'हस्ताचा पाऊस' (१९५३), 'सीताराम एकनाथ' (१९५१), 'काळी आई' (१९५४), 'जांभळाचे दिवस' (१९५७) यांसारखे त्यांचे कथासंग्रह प्रसिद्ध झाले. त्यांच्या कथांचे अनुवाद डॅनिश, जर्मन, जपानी आणि रशियन अशा विविध जागतिक भाषांत झालेले आहेत.

ग्रामीण कथेप्रमाणेच ग्रामीण कादंबरीच्या संदर्भातही त्यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली. 'बनगरवाडी' (१९५५), 'वावटळ' (१९६४), 'पुढचं पाऊल' (१९५०), 'कोवळे दिवस' (१९७९), 'करुणाष्टक' (१९८२) आणि 'सत्तांतर' (१९८२) या त्यांच्या कादंबर्या उल्लेखनीय आहेत. बनगरवाडीतून व्यंकटेश माडगूळकरांची प्रयोगशीलता प्रत्ययास येते. 'तू वेडा कुंभार', 'सती', 'पति गेले गं काठेवाडी' ही त्यांची काही नाटके विशेष उल्लेखनीय होत. त्यांच्या अनेक पुस्तकांना महाराष्ट्र राज्य पुरस्कार लाभले. नाट्यकृती सत्तांतरला १९८३चे साहित्य अकादेमीचे पारितोषिक प्राप्त झाले. १९८३मध्ये अंबेजोगाई येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद देऊन त्यांच्या साहित्यसेवेचा गौरव करण्यात आला.

रानोमाळ स्वच्छंद भ्रमंती करणारे निसर्गप्रेमी, शिकारी तसेच चित्रकार म्हणूनही त्यांची ख्याती आहे. चित्रकलेचे कसलेही औपचारिक शिक्षण नसताना त्यांनी ही कला प्राप्त केली, जागतिक कीर्तीच्या चित्रकारांच्या चित्रशैलीचा रसिकतेने शोध घेतला. त्यांची अनेक सुंदर रेखाटने प्रसिद्ध झालेली आहेत. आकाशवाणीवर ते दीर्घकाळ (१९५५-८५) नोकरीत होते. अशा या श्रेष्ठ लेखकाचे २८ ऑगस्ट २००१ रोजी निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**



**कर्जत : शहर परिसरात नगर परिषदेने केलेल्या स्वच्छता मोहिमेमुळे परिसर स्वच्छ झाला आहे.** (छाया : विजय मांडे)

## आरोग्य प्रहर

# ही फळं खाल्ल्यावर पाणी पिणे धोकादायक!

फळांचे सेवन करणे हे आपल्या आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर असते, हे सर्वांनाच माहीत आहे. फळांमध्ये व्हिटॅमिन्स, मिनरल्स, सुक्रोज, फ्रुक्टोज आणि ग्लूकोज मुबलत असतात, ज्यामुळे शरीराला एनर्जी आणि पोषक तत्वं मिळतात. फळं खाणे आरोग्यासाठी व तब्येतीसाठी लाभदायक असते. पण फळं खाण्याची योग्य पद्धतदेखील माहिती असली पाहिजे. अशी अनेक फळं आहेत, ज्यांचे सेवन केल्यानंतर पाणी पिणे टाळले पाहिजे. अन्यथा फळांपासून फायदा होण्याऐवजी नुकसान होऊ शकते. अशी फळे कोणती हे जाणून घेऊया.



केळं खाल्ल्याने बद्धकोष्ठता आणि पोटाच्या समस्यांपासून आराम मिळतो. पण केळं खाल्ल्यावर लगेचच पाणी प्यायले तर त्यामुळे पोटाशी संबंधित समस्या निर्माण होऊ शकतात.

फायबर, व्हिटॅमिन ए आणि सी, फॉलिक सिड, पोटॅशिअम आणि कॉपर ही पोषक तत्वा मुबलक प्रमाणात असलेला पेरू आपल्या आरोग्यासाठी खूपच लाभदायक असतो. मात्र पेरू खाल्ल्यानंतर कधीही पाणी पिऊ नये. त्यामुळे तुमची पचनसंस्था बिघडू शकते. पेरूवर पाणी प्यायल्यास पचनक्रिया ठप्प होते.

टरबूजामध्ये भरपूर पाणी असते. हे फळ पाण्याने भरलेले आहे. मात्र, टरबूज खाल्ल्यानंतर पाणी पिऊ नये. टरबूज खाल्ल्यानंतर पाणी प्यायल्याने पचनक्रियेवर विपरीत परिणाम होतो.

डाळिंब हे अतिशय रसाळ, मधुर, गोड फळ आहे. याच्या सेवनामुळे शरीरातील रक्ताची कमतरता दूर होते. डाळिंब हे आरोग्यासाठी खूप फायदेशीरही असते. डाळिंब खाल्ल्याने रक्त तर वाढतेच पण रोगप्रतिकारक शक्ती देखील मजबूत करते. मात्र, डाळिंब खाल्ल्यानंतर कधीही पाणी पिऊ नका. नाहीतर सिडिटी आणि उलटीचा त्रास होऊ शकतो.

**आंबट फळांवरही पाणी पिणे टाळावे!**

संत्र, द्राक्ष, आवळा आणि मोसंब, अशी आंबट फळ खाल्ल्यानंतरही पाणी पिऊ नये. आंबट फळांच्या सेवनानंतर पाणी प्यायलं तर पीएच लेव्हल बिघडू शकते, त्यामुळे पचनसंस्था खराब होण्याची शक्यता असते.

(या आर्टिकलमध्ये देण्यात आलेली माहिती व उपाय हे सामान्य ज्ञानावर आधारित आहेत. ते अवलंबण्यापूर्वी तज्ज्ञांचा सल्ला जरूर घ्यावा.)

## निवडक

### ॲड. दत्ता पाटील यांना अभिवादन



**नागोठणे** : कोएसोचे माजी अध्यक्ष ॲड. दत्ता पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त रविवारी (दि.२७) रोहा येथील मेहेंदळे हायस्कूल, मेढा हायस्कूल, घोसाळे हायस्कूल तसेच नागोठणे येथील श्रीमती गु. रा. अग्रवाल विद्यामंदिर, स. प्र. जैन ज्युनिअर कॉलेज, श्रीमती आनंदीबाई प्रधान महाविद्यालयामध्ये अभिवादन करण्यात आले. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त कोएसो अलिबागच्या वतीने सर्व शाळांमध्ये शनिवारी हस्ताक्षर स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षीसे देऊन गौरविण्यात आले. शाळेतील शिक्षक व सांस्कृतिक प्रमुख अनिल तिरमळे यांनी या कार्यक्रमाचे उत्तम असे नियोजन केले होते.

### मच्छीमार संघावर मनोहर बैलेंची फेरनिवड



**मुरूड** : रायगड जिल्हा मच्छिमार संघाची अध्यक्ष व उपाध्यक्षपदाची निवडणूक नुकतीच झाली. या वेळी पेणमधील प्रल्हाद पाटील यांची अध्यक्षपदी, तर उपाध्यक्षपदी मुरूड येथील सागरकन्या मच्छिमार संघाचे चेअरमन मनोहर बैले यांची सलग दुसऱ्यांदा बिनविरोध निवड झाली आहे. या वेळी महाराष्ट्र राज्य मच्छिमार शिखर संघाचे अध्यक्ष विजय गीदि, सागरकन्या मच्छिमार संघाचे संचालक रोहिदास मकु, भंडारी समाजाचे माजी उपाध्यक्ष बाबुराव रांजणकर, जिल्हा मच्छिमार संघाचे व्यवस्थापक राजेंद्र गावडे सर्व संचालक मंडळ व अन्य मान्यवर उपस्थित होते.

# खालापुरातील डिकसळ आदिवासीवाडीत पाण्याची समस्या

## शेत आणि नदीकाठावरून आणावे लागते पाणी

**चौक** : **प्रतिनिधी**

खालापूर नगर पंचायत हद्दीतील प्रभाग क्र. ८मधील आदिवासीवाडीला पाणीपुरवठा नसल्याने शेतात डवरा खोदून पाणी घेतले जाते. यामुळे येथील नागरिकांनी पिण्याच्या पाण्यासाठी शासनाला साकडे घातले आहे.





खालापूर तालुक्यातील खालापूर तालुक्याचे ठिकाण असलेले खालापूर नगरपंचायत आहे. खालापूर नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र. ८ येथे डिकसळ आदिवासीवाडी आहे. २५ कुटुंब राहात असलेल्या या आदिवासीवाडीमध्ये अद्यापही नळ पाणीपुरवठा योजना राबविण्यास आली नसून कोणतीही विहिर अथवा बोरवेल उपलब्ध नाही. त्यामुळे येथील आदिवासी महिला या पावसाळ्यात जवळच्या शेतात डवरा खोदून पाणी स्वतःच्या परिवारासाठी पुरवठा करतात, तर उन्हाळ्यात नदीकाठी अथवा नदीत डवरा खोदून पाणीपुरवठा करतात.

पाण्यासाठी येथील कुटुंबांना तारेवरची कसरत करावी लागते. उन्हाळ्याच्या दिवसांत तर येथील आदिवासी बांधवांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागते. त्यामुळे येथील पाणीप्रश्न सोडविण्यासाठी या आदिवासी बांधवांनी प्रशासनाला साकडे घातले आहे.

या प्रकरणी आम्ही आमदार महेंद्र थोरवे यांची भेट घेणार असल्याची माहिती आदिवासी बांधवांनी दिली आहे.

# रोहा न्यायालयातील ई-फाईलिंग प्रणाली सुविधा केंद्राचे काम प्रगतिपथावर

**नागोठणे** : **बातमीदार**



सर्वोच्च न्यायालयाची संकल्पना व निर्देशानुसार सर्वच न्यायालयांतील कारभार आता पेपरलेस होणार आहे. याचाच एक भाग म्हणून रोहा येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयातील ई-फाईलिंग कार्यप्रणाली सेवेचे काम रोहा न्यायालयाचे प्रमुख न्यायाधिश एस. एस. महाले यांच्या मार्गदर्शनाखाली प्रगतीपथावर आहे. रोहा बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. नानासाहेब देशमुख यांनीही या कामाची नुकतीच पाहणी केली व रोहा न्यायालयातही ही सेवा लवकरच कार्यन्वित होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

उच्च न्यायालय व महाराष्ट्र-गोवा बार असोसिएशन यांच्या सहकार्याने ही ई-फाईलिंग कार्यप्रणाली जिल्ह्यातील सर्व १५ तालुक्यांत सुरू करण्यात येणार आहे. यासाठी सर्व आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. रोहा न्यायालयातही ई फाईलिंग सेवा व फॅसिलिटी सेंटर लवकरच सुरु होणार असल्याने आता दाखल होणारी नवीन प्रकरणे ऑनलाईन पद्धतीने दाखल होणार आहेत.

यासाठी ई-फाईलिंग सुविधा केंद्रात संगणक, स्कॅनर, प्रिंटर, वेब कॅमेरा व इतर उपकरणे बसविण्यात येणार आहेत. या ई फाईलिंग सुविधा केंद्रात वकिलांच्या मदतीसाठी संगणक परिचालकही नियुक्ती करण्यात येणार असल्याचे ॲड. नानासाहेब देशमुख यांनी सांगितले.

# खालापुरातील वीजपुरवठा वारंवार खंडित; नागरिक हैराण

**खालापूर** : **प्रतिनिधी**

खालापूर गावातील सतत वीजपुरवठा खंडित यामुळे खालापूर नागरिक हैराण झाले असून सणासुदीला तरी महावितरण विभागाने कार्यतत्पर रहावे, अशी मागणी खालापूर नागरिक करीत आहेत.

तालुक्याचे ठिकाण असलेल्या खालापूर शहरात मागील १० दिवसांपासून सातत्याने वीजपुरवठा खंडित होत आहे. दिवसरात्र हा खेळ सुरू असतो. याचा त्रास नागरिकांना सहन करावा लागत असून विजेवर चालणारी उपकरणे नादुरुस्त होण्याचे प्रमाण वाढले आहे. विजेअभावी सर्व शासकीय कार्यालये, बँकांमधील कामे काम रखडत आहेत. पावसाचा जोर ओसरला असतानादेखील दिवसभर सातत्याने वीजपुरवठा खंडित होत आहे. वीजबिल वसुलीसाठी ज्या पद्धतीने महावितरणची कर्मचारी फिरत होते, त्या पद्धतीने तांत्रिक बिघाड शोधण्यासाठी महावितरण कामाला लागले तर वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा यावर उपाय नक्कीच मिळेल, असे मत नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

याबाबत उपमुख्य कार्यकारी अभियंता खालापूर सुभाष मुंडे यांनी सांगितले की, पावसात वाढलेली झुडपे, फांद्या तोडल्या आहेत. कर्मचारी संख्यादेखील पुरेशी आहे. वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रमाण कमी होत आहे. याशिवाय सावरोली येथे अडगळीत नेलेले खालापूर महावितरण कार्यालय खालापूर पंचायत समिती कार्यालय इमारतीत आणले आहे.

# महिलांसाठी व्यावसायिक कृषी प्रक्रिया उद्योग प्रशिक्षण



**चौक** : **प्रतिनिधी**

खालापूर तालुका कृषि अधिकारी कार्यालय यांच्या कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आत्मा व श्री विवेकानंद रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट तालुका रोहा यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांकरिता खालापूर तालुक्यातील नढाळवाडी येथे व्यावसायिक कृषि प्रक्रिया उद्योग प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.

महिला प्रशिक्षणात तालुका कृषी अधिकारी सुनील निंबाळकर यांनी आहारातील पौष्टिक तृणधान्यविषयी अतिशय साध्या पद्धतीने मार्गदर्शन केले. सुशील रुळेकर यांनी महिलांना नाचणी व वरी याचे जेवणातील महत्त्व सांगून त्यापासून तयार होणाऱ्या विविध पदार्थ यांच्या विषयी मार्गदर्शन केले. सुरेंद्र सिंघवी यांनी रानभाज्यांविषयी महत्त्व विषद करून कोणती रानभाजी कोणत्या मोसमात येते, ती कधी खावी, तिच्यापासून होणारे फायदे व रानभाजीचे आहारातील महत्त्व याविषयी महिलांना मार्गदर्शन केले.

नितीन महाडिक मंडळ कृषी अधिकारी खालापूर व चेतन चौधरी कृषि सहाय्यक कार्यक्रमास उपस्थित होते. विवेकानंद रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिटच्यूटमधील अश्विनी फुलारे, हर्षदा दगडे, सायली भगत यांनी महिलांना नाचणीचा केक, रवा केक, राजभोग केक व नाचणीची बर्फी बनविण्याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. सदर कार्यक्रमाचे पूर्ण नियोजन प्रकल्प संचालक आत्मा यांच्या श्रीमती बाणखेले, उपविभागीय कृषि अधिकारी फुलासुंदर व तालुका कृषी अधिकारी खालापूर सुनील निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक आत्मा प्रज्ञा पाटील यांनी केले होते.

# स्वच्छ, सुंदर माणगावसाठी सर्वांचाच पुढाकार



**माणगाव** : **प्रतिनिधी**

शासनाच्या स्वच्छ सर्वेक्षण कार्यक्रमांतर्गत प्रत्येक महिन्यात माणगाव नगरपंचायतीतर्फे स्वच्छतेचा विशेष कार्यक्रम हाती घेतला जात आहे. या स्वच्छता अभियानात प्रांताधिकारी संदीपान सानप, तहसीलदार विकास गारुडकर, नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, मुख्याधिकारी संतोष माळी यांच्या मार्गदर्शनाखाली उपनगराध्यक्ष, सर्व नगरसेवक, नगरसेविका, विषय समित्यांचे सभापती, उपसभापती, विद्यार्थी, शिक्षक, पालक तसेच सर्व शासकीय कार्यालयातील अधिकारी कर्मचारी व नागरिक, लोकप्रतिनिधी, सफाई कामगार शुक्रवारी (दि. २५) उतरले होते.

मुख्याधिकारी संतोष माळी यांनी माणगावकरांना स्वच्छता अभियानात सहभागी होण्यासाठी एक पाऊल पुढे टाकण्याचे आव्हान केले होते. स्वच्छता मोहिमेच्या चौथ्या टप्प्यात कचेरी रोड कॉर्नर ते वाकडाई देवी मंदिर या रस्त्याची स्वच्छता करण्यात आली. स्वछता अभियानात एकूण ५३३ सरकारी अधिकारी, कर्मचारी, स्वयंसेवी संस्था, विद्यार्थी, नागरिक आणि कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवला होता. यामध्ये माणगांव शहरातील अशोकदादा साबळे विद्यालय, श्रद्धा इंग्लिश स्कूल, विवा विद्यालय, कामेरकर माध्यमिक विद्यालय, टिकामभाई मेथा महाविद्यालय, द. ग. तटकरे महाविद्यालय आदी शाळा व महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थी सहभागी झाले होते. या वेळी माणगाव प्रांत अधिकारी. डॉ. संदीपान सानप, तहसीलदार विकास गारुडकर, माणगांव नगरपंचायत मुख्याधिकारी संतोष माळी, माणगाव नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, माजी नगराध्यक्ष आनंद यादव, उपनगराध्यक्ष राजेश मेहता, स्वच्छता सभापती दिनेश रातवडकर आदींसह नगरसेवक, नगरसेविका, शासकीय अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

कचेरी रस्त्यावरील दुकानाबाहेर फुटपाथवर रस्त्यावर ठेवण्यात आलेला माल, बेकायदेशीर फेरीवाले यांच्यावर जप्तीची कारवाई करण्यात आली. कचेरी रस्त्यावरील फुटपाथ दुरुस्त करण्यात आले. कचेरी रस्त्यावरील असणारे खड्डेही भरण्यात आली. यादिवशी ११ टन कचरा उचलण्यात आला.

# आकाशातील सप्तरंगी इंद्रधनुष्य डोळ्यांना सुखावणारा देखावा



**माणगाव** : **प्रतिनिधी**

श्रावण महिना सुरू झाला की, निसर्गात विविध बदल होत असून निसर्गप्रेमींसाठी एक पर्वणी ठरत आहे. सर्वत्र माळराने हिरवीगार झाली असून दिवसभरात ऊन, सावल्या व सायंकाळी इंद्र धनुष्य पाहण्याची मोठी पर्वणी निसर्गप्रेमींना मिळत आहे.

ऊन-पावसाच्या पार्श्वभूमीवर आकाशात सप्तरंगी इंद्रधनुष्य दिसत असून डोळ्यांना सुखावणारा देखावा पाहण्यात अबालवृद्ध हरखून जात आहेत. कधी ऊन, तर कधी पावसाच्या सरी येत आहेत. अशा या वातावरणात सकाळ, सायंकाळी सूर्यास्ताच्या पूर्वी अवकाशात इंद्रधनुष्य निर्माण होत आहेत. उन्हाची तिरीप व सूर्याच्या विरुद्ध दिशेला दिसणारे इंद्रधनुष्य असे विलोभनीय दृश्य अनेक भागातून अलिकडे दिसत असते.

सूर्याची किरणे पावसाच्या थेंबावर पडतात तेव्हा त्या किरणांचे विस्थापन होते आणि त्यामुळे सप्तरंगी इंद्रधनुष्य तयार होते. या विक्षेपणात प्रकाशाच्या किरणांचे परावर्तन आणि अपवर्तन होत असते. इंद्रधनुष्य सकाळी पश्चिमेला आणि सायंकाळी पूर्वेला दिसते. साधारणपणे अवकाशात एका वेळी एक तर क्वचित वेळी दोन इंद्रधनुष्य दिसतात.

पौराणिकतेनुसार देवांचा राजा इंद्र याचे धनुष्य म्हणजे इंद्रधनुष्य असे म्हटले जाते. यामध्ये एकूण सात रंग असतात. इंद्रधनुष्य अनेक प्रकारची असली तरी संपूर्ण गोलाकार इंद्रधनुष्य पडणे दुर्मिळ योग समजला जातो. त्याला 'इंद्रवज्र' असे म्हणतात. प्रत्येक इंद्रधनुष्य पूर्ण गोल असते, मात्र स्थिती क्षितिजामुळे ते अर्धगोल दिसते. पावसाचे थेंब, त्याची दिशा, अंतर आणि वेगावर त्याचे दिसणे अवलंबून असते. परतीच्या पावसातील इंद्रधनुष्याचा नजारा आपापल्या भ्रमणध्वनीत, कॅमेरामध्ये टिपण्यासाठी अनेक जण उत्सुक असतात.

**श्रावण महिना सुरू झाल्यावर गेल्या काही दिवसांपासून अनेक वेळा आकाशात इंद्रधनुष्य दिसत आहेत. अतिशय सुंदर दिसणारे हे दृश्य कॅमेऱ्यात टिपून घेणे आनंदाचे असते. दुर्मिळ योग असल्याने हे दिसताच आनंद होतो.**

**-सायराबानू चौगुले,**
**साहित्यिक, निसर्गप्रेमी**

**इंद्रधनुष्य पडणे हे नैसर्गिक आहे प्रकाशाच्या परावर्तनामुळे हे होत असते. यात सात रंग असून ते क्रमाने असतात. सूर्याच्या विरुद्ध दिशेला ते पडते. पावसाळ्यात ही बाब नित्याची असते.**

**-हर्षल जोशी,**
**विज्ञान शिक्षक**

# सर्वसामान्यांना अर्थसाक्षर करणे गरजेचे -शैलेश कोतमिरे

**अलिबाग** : **प्रतिनिधी**



सर्वसामान्य जनता अर्थ निरक्षर असल्यामुळे त्यांची आर्थिक फसवणूक होते. त्यामुळे जनतेला अर्थसाक्षर करणे ही काळाची गरज आहे, असे मत महाराष्ट्र राज्य सहकारी संख्या अप्पर निबंधक शैलेश कोतमिरे यांनी व्यक्त केले.

कमळ नागरी सहकारी पतसंस्थेने प्रकाशित केलेल्या गणेश निमकर यांनी लिहिलेल्या 'सहकारी बँकिंग संकल्पना' या पुस्तकाचे प्रकाशन शनिवारी (दि. २६) करण्यात आले. या पुस्तक प्रकाशन समारंभात शैलेश कोतमिरे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. बुलढाणा अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष देशपांडे, जिल्हा उपनिबंधक प्रमोद जगताप, पुस्तकाचे लेखक गणेश निमकर, गिरीश तुळपुळे, जिल्हा उपनिबंधक प्रदीप बर्गे, मालोजी राजे बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश लड्डा, शिवकृपा पतसंस्थेचे अध्यक्ष गोरख चव्हाण, माजी अध्यक्ष चंद्रकांत वंजारी, रघुजीराजे आंग्रे, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक, प्रदीप नाईक आदी या वेळी उपस्थित होते.

सहकारी बँकिंग संकल्पना हे पुस्तक सहकारासाठी उपयुक्त ठरेल. हे पुस्तक वाचून लोकांच्या मनातील सहकाराबद्दलच्या शंका दूर होतील. हे पुस्तक सर्वसामान्यांना अर्थसाक्षर करेल, असे शैलेश कोतमिरे म्हणाले. गणेश निमकर यांनी लिहिलेले पुस्तक सहकारी संस्थांसाठी उपयुक्त आहे. या पुस्तकात सोप्या भाषेत त्यांनी बँकमधील सर्व संकल्पना आहेत. राज्यातील प्रत्येक सहकारी संस्थेने हे पुस्तक घेतले पाहिजे. आपल्या कर्मचारी, अधिकारी संचालकांना हे पुस्तक वाचायला सांगून त्यावर परीक्षा घ्यावी, असे शिरीष देशपांडे म्हणाले.

पुस्तकाचे लेखक गणेश निमकर यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. कोकण नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष गिरीश तुळपुळे यांनी प्रास्ताविक केले. कमळ पतसंस्थेचे अध्यक्ष सतीश पाटील यांनी सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन केले.


**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां.विभाग, पनवेल**
**पिनकोड - ४१० २०६**
E-mail- panvel.ee@mahapwd.gov.in
**दूरध्वनी क्रमांक ०२२- २७४५२७७८ फॅक्स — ०२२-२७४६७४४०**
**ई- कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. ८० (ई-निविदा) सन २०२३-२४**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दुरध्वनी क्र. ०२२- २७४५२७७८ फॅक्स-०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत कंत्राटदाराला योग्य त्या कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सुचना www.mahapwd.com and www. mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.

टिप- या निविदेमध्ये एकूण १३ काम समाविष्ठ असुन ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक २८.०८.२०२३ सकाळी १०.०० ते दिनांक ०४.०९.२०२३ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेत स्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

सही/-
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
पनवेल

ई-निविदाजा.क्र./सा.बां./पनवेल/
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां.विभाग, पनवेल, जि.रायगड
दिनांक :- २८/८/२०२३

# हिरवळीसाठी नवी मुंबई मनपाचे पाऊल

## वृक्षगणनेसाठी तीन कोटी खर्च करणार

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महानगरपालिकेने वृक्षगणनेसाठी तीन कोटी रुपये खर्च करण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये एका झाडामागे किमान १२ ते १८ रुपयांचा खर्च अपेक्षित धरून वृक्षगणनेच्या निविदा मागवण्यात आल्या आहेत, अशी माहिती उद्यान विभागाचे उपायुक्त दिलीप नेरकर यांनी दिली.

२१व्या शतकातील शहर म्हणून नवी मुंबईकडे पाहिले जाते. या आधुनिक शहराला निसर्गसंपन्न कसे करता येईल याकडे महापालिकेचे लक्ष असते. त्यानुसार दरवर्षी महापालिका वृक्षलागवडही केली जाते. याशिवाय माझी वसुंधरांतर्गत शहरात हिरवळ निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात असतो. शहरात मियावाकी पद्धतीने वृक्षलागवड करून अल्प जागेत अधिकाधिक झाडे लावण्याचा प्रयत्न पालिकेच्या माध्यमातून करण्यात आला आहे.

दर पाच वर्षांनी शहरातील वृक्षांची गणना केली जाते, मात्र २०१२ नंतर वृक्षगणना करण्यात आली नाही. २०१२ यावर्षी वृक्षगणनेनुसार शहरातील वृक्षांची संख्या नऊ लाख इतकी होती. वृक्षगणनेतून शहरातील वृक्षांच्या संख्येसह शहरातील दुर्मिळ वृक्ष, औषधी वृक्ष किती आहेत याचीही वेगळी माहिती मिळणार आहे. तसेच फुले, फळे यांची किती झाडे आहेत, त्यांचे कोणते प्रकार आहेत याचीही माहिती मिळणार आहे. शहरात सर्व मोठे झाड कोणते आहे. सर्वात जुने झाड कोणते आहे, ही माहिती मिळणार आहे.



### नगर प्रदूषणविरहित बनविण्याचा प्रयत्न

*शहरात सध्या तीन व्यक्तींच्या मागे एक वृक्ष अशी वृक्षांची संख्या आहे, मात्र एका व्यक्तीच्या मागे एक वृक्ष असावेत, यासाठी उद्यान विभागाच्या वतीने काम चालू करण्यात आले आहे. प्रदूषण मुक्त शहर निर्माण करावयाचे असेल, तर एका व्यक्तीमागे एक वृक्ष असणे आवश्यक आहे. त्यानुसार वृक्षलागवड करण्याचे उद्यान विभागाच्या विचाराधीन आहे.*

## निवडक

### आर्या नाक्तीची राष्ट्रीय स्तरावर निवड



**नवी मुंबई :** पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरुळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलात झोनल लेवलवर घेतलेल्या राष्ट्रीय स्टेम चॅलेंज २०२३ अंतर्गत मॉडेल बनविणे या प्रकारात विद्याभवन माध्यमिक इंग्रजीची इ. आठवीची विद्यार्थीनी आर्या सागर नाक्ती हिची पुणे येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्टेम चॅलेंज २०२३मध्ये मॉडेल मेकिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. आर्या नाक्ती हिस या स्पर्धेसाठी सहशिक्षक मनोज मयेकर यांचे मार्गदर्शन लाभले. तिच्या या निवडीबद्दल पुणे विद्यार्थी गृहाचे संचालक दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीजा नायर, सुवर्णा मिसाळ, राजकुमारी इंदलकर, मनिषा मुळिक, स्टेमचे अधिकारी राहूल गवई, अनिकेत शेंडकर, उपस्थित इतर सहकारी व शिक्षकांनी आर्या हिचे अभिनंदन केले व राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

### आपटा हायस्कूलच्या नूतनीकरणासाठी सभा



**रसायनी :** कोएसो. माध्यमिक विद्यालय नूतन इमारत बांधकाम करण्यासंदर्भात आजी-माजी विद्यार्थी, ग्रामस्थांनी सभा आयोजित केली होती. या सभेत संस्थेने लवकरात लवकर शाळेचे बांधकाम पूर्ण व्हावे यासाठी एकमताने ठराव मंजूर झाला. सर्वांनी सहीरुपी पाठिंबा देऊन नूतन इमारत पूर्ण होईपर्यंत हा लढा चालूच राहील असा यलगार पुकारला. या इमारतीच्या आताची अवस्था बिकट आहे. ती सर्व इमारत पाडून नवीन केली पाहिजे यासाठी अर्ज करण्यात आला आहे.

### पेठजवळील नदीत युवकाचा मृतदेह

**पनवेल :** तालुक्यातील पेठ गावाजवळील नदीत एका युवकाचा मृतदेह आढळला असून यासंदर्भात त्याच्या कुटुंबीयांनी शनिवारी (दि.२६) मुलाचे अपहरण केल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात केली होती. तन्मय आशिष मानकामे (वय १४, रा. पेठ गाव) असे या मुलाचे नाव असून या तक्रारीनंतर पोलीस त्याचा शोध घेत असताना या मुलाचे कपडे गावातील नदीच्या काठी मिळाले. मुलाचा नदीत शोध घेतला असता त्याचा मृतदेह रविवारी (दि. २७) सकाळी आढळला. याबाबत पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## नवी मुंबईला देशात अव्वल करण्याचा निर्धार -आयुक्त

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई शहराची आंतरराष्ट्रीय ओळख निर्माण व्हावी, यासाठी चालू वर्षांपासूनच नवी मुंबईत आंतरराष्ट्रीय फ्लेमिंगो फेस्टीव्हल आयोजित करण्यात येईल, अशी घोषणा नवी मुंबई महापालिकेचे आयुक्त राजेश नार्वेकर यांनी शुक्रवारी (दि. २५) एका कार्यक्रमात केली. वाशी येथील मराठी साहित्य सांस्कृतिक मंडळाच्या सभागृहात शुक्रवारी झालेल्या कार्यक्रमात पायाभूत सुविधांच्या आगाडीवर देशभरात नावलौकीक असलेले नवी मुंबई शहर स्वच्छतेच्या बाबतीत राज्यात अव्वल आहेच. त्यासोबतच या शहराला देशात पहिला क्रमांक मिळवून देण्याचा निर्धार आयुक्त नार्वेकर यांनी व्यक्त केला.

नवी मुंबईचे वयोमान आज ४० ते ४५ च्या घरात आहे. या वयातच हे शहर पुनर्विकासाचे नवे प्रारूप अंगिकारत आहे. हा बदल घडत असताना शहरातील पायाभूत सुविधा आणि विकासाच्या संकल्पनांचा नव्याने विचार करावा लागेल. त्यासाठी ठोस धोरणे आखावी लागतील. यासाठी २०५०पर्यंत वाढणाऱ्या लोकसंख्येला पुरेल इतक्या पाण्याचे नियोजन आम्ही करत आहोत, अशी भूमिका नार्वेकर यांनी मांडली.

स्थानिक स्वराज्य संस्थांकडून शहरातील नागरिकांना अनेक सुविधा पुरविण्यात येतात. नियमित मुबलक पाणी, सार्वजनिक वाहतूक, आरोग्य-शिक्षण व्यवस्था, वाहतूक व्यवस्था, घनकचरा व्यवस्थापन यासारख्या अनेक सुविधा पुरवण्यात येतात. त्या पुरवण्यासाठी स्थानिक प्रशासन कसे नियोजन करते, याचे विस्तृत विवेचन त्यांनी केले.

नवी मुंबईला सर्वाधिक भेडसावणाऱ्या पार्किंगच्या समस्येतून मार्ग काढण्यासाठी आगामी काळात सिडको, एमआयडीसी यांच्याकडून भूखंडाचे हस्तांतरण करण्याची प्रक्रिया वेगाने केली जात आहे, तसेच पुनर्विकास प्रकल्पांच्या नव्या उभ्या राहणाऱ्या इमारतीमधून पार्किंगची धोरणाची काटेकोर अंमलबजावणी केली जाईल याची दक्षता घेतली जात आहे, असे नार्वेकर म्हणाले.

मुंबई महानगर प्रदेशात खड्डे विरहीत शहर हा नावलौकीक आम्हाला मिळाला तसेच यापुढेही उत्तम रस्ते राखण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे ते म्हणाले.

## खारघरमध्ये विद्यार्थ्यांसाठी आरोग्य तपासणी शिबिर

**पनवेल : वार्ताहर**

रोटरी क्लब ऑफ खारघर मिडटाऊन व इंडियन अकॅडमी ऑफ पीडियाट्रिक्सचा राष्ट्रीय उपक्रम आहे. त्यानुसार सामान्य आरोग्य तपासणी शिबिराबरोबर एक सत्र आयोजित केले होते. ज्यात जिल्हा परिषद मुरबी, खारघर शाळेत लहान मुलांच्या जंकफूडच्या सवयी, झोपेची पद्धत, स्क्रीन वेळ, पदार्थांचे सेवन प्रतिबंध, अंमली पदार्थांचे व्यसन आणि पर्यावरणीय प्रदूषण या विषयांवर तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांशी व काही पालकांशी माहितीपर चर्चा करण्यात आली.

शाळेत जाणारी मुले शारीरिक आणि मानसिक वाढीच्या कोवळ्या वयात असतात आणि हे असे वय आहे जिथे मुलांचे उत्तम स्तरावर पालनपोषण केले गेले तर त्यांचे रूपांतर निरोगी रोगमुक्त प्रौढांमध्ये होते. म्हणूनच, या मूलभूत गोष्टींमध्ये प्रवेश करण्याच्या उद्देशाने, रोटरी खारघर मिडटाऊन टीममधील सहा डॉक्टर, स्वयंसेवक आणि एसएसएसच्या काही डॉक्टरांनी, मुरबी गाव, खारघर येथील जिल्हा शाळेत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करून १५६ विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली.

या वेळी रोटरी क्लब ऑफ खारघर मिडटाऊनचे मानद सदस्य डॉ. चित्रा कुलकर्णी, डॉ. कोमल गुंडेवार, समीर कर्वकर, ॲन. प्रियांका करवकर, अध्यक्ष अनुप गुप्ता, फर्स्ट लेडी मोना गुप्ता, सेवा प्रकल्प संचालक आणि पीई शैलेश पटेल, सचिव डॉ. रविकिरण कुमार यांच्यासह इतर रोटरीयन, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षिका आणि विद्यार्थी उपस्थित होते.



## नेरूळमध्ये शासन आपल्या दारी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

शासन आपल्या दारी, योजना कल्याणकारी सर्व सामान्यांच्या दारी हा अभिनव उपक्रम भाजप प्रभाग क्रमांक ३२ आणि तहसीलदार कार्यालय, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने माजी महापौर जयवंत सुतार यांच्या पुढाकाराने स्व. धोंडू बाळाजी सुतार गुरुजी कलाकेंद्र नेरूळ येथे आयोजित करण्यात आला.



संजय गांधी निराधार अनुदान योजना शिबिरांतर्गत महाराष्ट्र शासनाने ज्येष्ठ नागरिक, विधवा, घटस्फोटित महिला, निराधार स्त्री, पुरुष, दिव्यांगांना संजय गांधी निराधार अनुदान योजनेंतर्गत आर्थिक मदत मिळण्यासाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. या योजना सामान्य घटकांना मिळाव्यात या सामाजिक बांधिलकीतून माजी महापौर जयवंत सुतार यांनी आयोजित भव्य शिबिर शेकडो गरजूंनी लाभ घेतला. या वेळी भाजप महामंत्री डॉ. राजेश पाटील, सामाजिक कार्यकर्ते जयेंद्र सुतार, महिला संघटक निर्मला सुतार, मीनाक्षी हिलाल आदी उपस्थित होते.

शासन आपल्या दारी, योजना कल्याणकारी, सर्व सामन्यांच्या दारी हा उपक्रम आयोजित करून आर्थिक दुर्बल आणि निराधार व्यक्तिला सामाजिक जाणिवेतून मदत करण्याचा आमचा प्रयत्न भाजपच्या वतीने करण्यात आला आहे. असेच सामाजिक उपक्रम घेऊन सामान्य घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल, असे आश्वासन माजी महापौर जयवंत सुतार यांनी दिले. माजी महापौर जयवंत सुतार हे नेहमीच विविध शिबिरांचे आयोजन करीत असतात. प्रत्येक शिबिराचा लाभ सर्वसामान्य जनतेला आणि तळागाळातील व्यक्तीला कसा होईल हाच उद्देश डोळ्यासमोर ठेवून शिबिराचे आयोजन त्यांनी केले आहे. संजय गांधी निराधार अनुदान योजना शिबिराचे नवी मुंबईमध्ये पहिल्यांदाच जयवंत सुतार यांच्या वतीने आयोजन करण्यात आले.

या शिबिराचा लाभ मोठ्या संख्येने नागरिकांनी घेतला असून जयवंत सुतार यांच्या कामाची हीच खरी पोचपावती असल्याचे डॉ. राजेश पाटील यांनी आपल्या भाषणात सांगितले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भाजपचे नरेश सुतार, हणमंत रोडे, सुभाष जाधव, पांडुरंग राठोड, नितीन शेंडगे, जयेश धुमाळ, संतोष गुप्ता यांनी मोलाचे सहकार्य केले.

## डासांचा प्रादुर्भाव; धुरीकरणाची मागणी

**नवी मुंबई :** महापालिका प्रभाग ८६मध्ये नेरूळ, सेक्टर ६ आणि सारसोळे गाव या परिसराचा समावेश होत आहे. पावसाळ्यात या परिसरात डासांची संख्या वाढली आहे. यामुळे ताप, मलेरिया, डेंग्युचे रुग्ण आढळू लागले आहेत. त्यामुळे येथील नागरिकांनी परिसरात धुरीकरणाची मागणी केली आहे.

सध्या डासांचे प्रमाण वाढल्याने ग्रामस्थ व रहिवासी त्रस्त झाले आहेत. सोसायटी आवारातही लोकांना फिरता येत नाही. त्यामुळे साथीचे आजार नियत्रंणात आणण्यासाठी धुरीकरण अभियान राबविणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

## उरण महाविद्यालयात उद्योग-व्यवसायविषयक मार्गदर्शन

**उरण : वार्ताहर**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयामध्ये शुक्रवारी (दि.२५) रायगड जिल्हा उद्योग केंद्र आणि मिटकॉन यांच्या संयुक्त विद्यमाने करिअर गायडन्स विभाग आणि अर्थशास्त्र विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी उद्योग कसा सुरू करावा, कोणते उद्योग व्यवसाय निवडावेत, उद्योग व्यवसायासाठी आवश्यक असणारे मशीन, तंत्रज्ञान, भांडवल, शासकीय योजना, सबसिडी या सर्व घटकांविषयीयक रायगड जिल्हा उद्योग केंद्राचे इन्स्पेक्टर मोहन पालकर आणि मिटकॉनचे समन्वयक वाघमारे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, तसेच विविध प्रश्नांना उत्तरे त्यांनी दिली. हा कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बळीराम गायकवाड व प्रा. के. ए. शामा याच्या मार्गदर्शनाखाली झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि प्रास्ताविक करिअर गायडन्स सेलचे विभाग प्रमुख डॉ. एच. के. जगताप तसेच कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान आयक्यूएसी कोऑर्डिनेटर डॉ. ए. आर. चव्हाण यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले आणि प्रा. ए. के. गायकवाड यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमात महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी सहभागी झाले होते.

## पामबीच मार्गावर दुतर्फा पार्किंगमुळे वाहतूक कोंडी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईचा क्विन नेकलेस समजल्या जाणाऱ्या पामबीच मार्ग हा वेगवान व देखणा मार्ग म्हणून प्रसिद्ध आहे. याच मार्गावर वाशी रेल्वे उड्डाणपुल सोडताच वाशी उपनगराला सुरुवात होते. या उपनगराच्या पहिल्याच सिग्नलपासून ते कोपरी उड्डाणपुलापर्यंत बेकायदा पार्किंग पहायला मिळते. त्यातच सतरा प्लाझा परिसरात बेकायदा पार्किंगने वाहतूक व्यवस्थेचा पुरता खेळखंडोबा करुन टाकल्याचे चित्र आहे. या मार्गावर स्त्यावरच बेकायदा पार्किंग ही पालिकेची व वाहतूक व डोकेदुखी ठरली आहे.

पामबीच मार्गावरील रस्त्यावर व्हॅले पार्किंग सुरू आहे. वाशीत आरेंजा कॉर्नर ते कोपरी पुलापर्यंत सातत्याने येथे बेकायदा पार्किंग केले जाते. पामबीच मार्गावरील बेकायदा पार्किंगबाबत पालिकेने व वाहतूक विभागाने बेकायदा वाहनांवर कारवाई केल्यावर त्यांची पाठ फिरताच पुन्हा गॅरेजवाल्यांनी व वाहनचालकांनी बेकायदा पार्किंगला बिनधास्तपणे रस्त्यावरच पार्किंगला सुरवात केली आहे. त्यामुळे पालिका आयुक्तांनी व वाहतूक विभागाने याबाबत ठोस उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.



## केबीपी महाविद्यालयात भारतीय संविधान मूल्यांवर व्याख्यान

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात सामाजिक जबाबदारी समितीच्या वतीने शनिवारी (दि. २६) भारतीय संविधान मूल्यांवर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. सुरेश सावंत उपस्थित होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. शुभदा नायक होत्या.



ॲड. सुरेश सावंत यांनी भारतीय राज्यघटनेचा इतिहास आणि त्याची वैशिष्ट्ये आणि संविधानाचे सर्वसमावेशक महत्त्व या विषयावर उपयुक्त अशी माहिती दिली. त्यांनी संविधानाचा मसुदा तयार करण्यासाठी जबाबदार असलेल्या संविधान सभेचे महत्त्व व स्वरूप विशद केले. याशिवाय त्यांनी संविधानातील प्रस्तावना, मार्गदर्शक तत्वे, मूलभूत हक्क आणि कर्तव्ये याविषयी व्यापक चर्चा केली.

कार्यक्रमाचे नियोजन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शुभदा नायक यांच्या मागदर्शनाखाली करण्यात आले. कार्यकमाचे प्रास्ताविक डॉ. हर्षा गोयल यांनी, सूत्रसंचालन प्रज्योत मुळे यांनी तर आभार राहुल मुळीक यांनी मानले.

## घाऊक बाजारात आल्याचे दर वधारले

**नवी मुंबई :** बाजारात सध्या आल्याचे बाजारभाव चढेच आहेत. जुन्या आल्याला अधिक मागणी असून आवक कमी असल्याने दर कडाडले आहेत. घाऊकमध्ये अवघे जुने आले दाखल होत असून उर्वरित नवीन आले आवक होत आहे. त्यामुळे घाऊकमध्ये जुने आले प्रतिकिलो २१०-२२० रुपये तर नवीन आले ७०-७५ रुपयांनी विक्री होत आहे.

सध्या पावसाळा सुरू झाला असून या थंडगार वातावरणात नागरिक आले घातलेला गरमागरम फक्कड चहा पिण्यास पसंती देत असतात. गृहिणींकडूनही प्रत्येक भाजीमध्ये आल्याला पसंती दिली जाते.

## रामप्रहर श्रावणधारा

### श्रावण...

आला श्रावण मास
व्रतवैकल्याचा साज
मंगळागौर पूजन
सख्यामैत्रिणी नटती खास!

श्रावणात ऊनपावसाचा खेळ
नभांगणी इंद्रधनुचे तोरण
वसुंधरा हर्षित हिरवाईत
सुखावले चातकाचे कोंदण

श्रावणमास आला आला
मना माहेरची आस
रक्षाबंधन बंधुभगिनी स्नेह
नागोबा पूजन बंधुमानस

निसर्गाच्या कुंचल्यातून रेखाटून
अवनीवरी नयनरम्य बहर
झाडे, वेली बहरती सुखावती
मनी बळीराजाच्या आनंद अपार

जीवन संजीवन करण्यास
सुखविती मृगधारा मनोमनी
सृजनाची निर्मिती मृगधारेत
श्रावणमासी हर्षउल्हास जनी

दहीहंडी एकजुट सवंगड्यांसह
एकमेकां सहकार्य आधार देत
संस्कार, देशप्रेम हृदयात
बालकवींची कविता आठवणीत...!



- ऋतुजा रवींद्र गवस
नवी मुंबई

# कर्जतमध्ये रस्त्यावर पार्किंग केलेल्या गाड्या, अनधिकृत होर्डिंग्जवर कारवाई

## ■ पालिकेकडून स्वच्छता मोहिमेदरम्यान सरसकट सफाई


(छाया : विजय मांडे)

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगर परिषद हद्दीत सलग चौथा महिना स्वच्छता मोहीम आणि अनधिकृत बांधकामे दूर करण्यासाठी अभियान हाती घेण्यात आले. कर्जत चारफाटा, भिसेगाव या रस्त्यानंतर आता मुख्य शहरातील महावीर पेठ भागात स्वच्छता मोहीम, बेकायदा पार्किंग केलेल्या गाडी रस्त्यातून बाजूला करणे आणि शहरातील अनधिकृत होर्डिंग्जवर कारवाई करण्यात आली.

कर्जत नगर परिषद हद्दीत रायगड जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने सलग चौथ्या आठवड्यात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. मागील तीन वारी पालिकेच्या वतीने कर्जत चारफाटा ते बिकानेर या भिसेगाव भागातील रस्त्यावरील अतिक्रमण बाजूला करण्यात आली तसेच रस्त्यावर स्वच्छता मोहीम राबवून तेथे वृक्षारोपणही केले गेले. या वेळी पालिकेकडून उल्हास नदीच्या बाजूला महावीर पेठ आणि गणेश घाट येथे स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

स्वच्छतेबरोबर अनधिकृतपणे उभ्या राहणाऱ्या आणि पार्किंग करण्यात येणाऱ्या गाड्यांवर पोलीस प्रशासनाच्या मदतीने दंडात्मक कारवाई करण्यात आली तसेच रस्त्यावर उभ्या असलेल्या गाड्या संबंधित मालकांना सांगून तिथे लावण्यास प्रतिबंध करण्यात आला. या वेळी उल्हास नदीच्या बाजूला असलेले फुटपाथ स्वच्छ करण्यात आले, तर रस्त्यावर अनधिकृतपणे टाकलेले बांधकाम साहित्य व केरकचरा उचलण्यास सांगण्यात आले. याच भागातील उगले हाईट परिसरातील नदीकिनारच्या कायमस्वरूपी गाड्या हटवून रोड आणि फुटपाथ पालिकेने मोकळा करण्यात आला.

मुख्याधिकारी वैभव गारवे यांच्या मार्गदर्शनखाली नगर परिषदेने शहरात स्वच्छता मोहिमेबरोबरच अनधिकृत बांधकामे आणि बेकायदा बॅनर यावर कारवाई केली. पालिकेकडून शहरातील मध्य बाजारपेठेतील बेकायदेशीर हातगाड्या, फेरीवाले तसेच रोडवरच्या गाड्यांसकट इतर भागातील बेकायदेशीर बाबींवर कारवाई होणे अपेक्षित आहे, तर नगर परिषदेच्या आवारात रात्रीच्या वेळी उभ्या करून ठेवणाऱ्या गाड्यांवरही कारवाई होणे किंवा पार्किंग टॅक्स नगर परिषदेने लावण्याची मागणी होत आहे.

या कारवाई मोहिमेत नगर परिषदेचे कार्यालय अधीक्षक रवींद्र लाड, स्वच्छता निरीक्षक सुदाम म्हसे, नगर अभियंता मनीष गायकवाड, रचना सहाय्यक स्वागत विरंगुळे, विद्युत अभियंता दीपक खेबडे, लेखापाल अजय जोरी, कल्याणी लोखंडे, बापू बहिरम, अविनाश पवार, जयेश घरत, निलेश निकाळजे, सुदेश गायकवाड आणि कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

# लम्पी रोग नियंत्रणासाठी रायगडात यंत्रणा सज्ज

## घाबरून न जाता काळजी घेण्याचे आवाहन



**अलिबाग : प्रतिनिधी**

लम्पी चर्मरोग नियंत्रणासाठी रायगडात जिल्ह्यात पशुसंवर्धन विभागासह इतर यंत्रणा सज्ज करण्यात आली आहे. सर्व ग्रामपंचायतींना कीटकनाशके फवारणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सध्या जिल्ह्यात एकही केस आढळून आलेली नाही. पशुधन पालक शेतकऱ्यांनी घाबरून न जाता पशुधनाची काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी केले आहे.

रायगड अलिबाग जिल्ह्यात सध्या लम्पी चर्मरोगाचा प्रादुर्भाव झालेला नाही. जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागाचे १०० दवाखाने व राज्य शासनाचे २२ दवाखाने यांच्या माध्यमातून ९८ टक्के लसीकरण पूर्ण झाले आहे. त्याचबरोबर सर्व ग्राम पंचायतींना गावात व गोठ्यामध्ये जनावरांच्या अंगावर गोचीड गोमाशा नाश करण्यासाठी फवारणी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. लम्पी रोगाचा प्रादुर्भाव जिल्ह्यात होणार नाही यासाठी पुरेपूर दक्षता घेण्याबाबत डॉ. बास्टेवाड यांनी निर्देश दिले आहेत.

जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. श्यामराव कदम यांनी या रोगाला आळा घालण्यासाठी जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभाग पूर्णपणे सज्ज असून मदतीसाठी पशुसंवर्धन विभागाचा टोल फ्री क्रमांक १८००-२३३०-४१८ अथवा राज्यातील कॉल सेंटरमधील पशुसेवेचा टोल फ्री क्रमांक १९६२वर तत्काळ संपर्क साधावा, असे कळविले आहे.

लम्पी चर्मरोग हा केवळ गोवंशवर्गातील जनावरांना होणारा विषाणूजन्य त्वचारोग आहे. हा कीटककांपासून पसरतो. जनावरांपासून मानवांना संक्रमित होत नाही.

# डॉ. सलोनी पाटीलचे यश



**मुरूड : प्रतिनिधी**

जंजिरा मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. संजय पाटील यांची कन्या सलोनी पाटील हिने फिलिपिन्स येथून एमबीबीएस उत्तीर्ण केल्यानंतर भारतातील नॅशनल मेडिकल कॉन्सिलतर्फे घेण्यात येणाऱ्या फॉरेन मेडिकल ग्रॅज्युएशन एक्झामिनेशन एफएमजीई परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.

या परीक्षेची काठिण्य पातळी अधिक असल्याने खूपच थोडे परीक्षार्थी उत्तीर्ण होतात. यंदा या परीक्षेचा निकाल केवळ नऊ टक्के इतका लागला आहे. यावरून डॉ. सलोनी पाटील हिच्या यशाची कल्पना येऊ शकते. अभ्यासू असलेल्या डॉ. सलोनीने अतिशय परिश्रमपूर्वक हे यश प्राप्त केले आहे. त्यामुळे डॉ. सलोनी हिने प्राप्त केलेले यश खरोखरच वाखाणण्याजोगे आहे. मुरूड तालुक्यात सलोनीचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. डॉक्टरवर्गातून तिचे कौतुक होत आहे.

# माथेरानचे पाणी दर कमी करण्याची पर्यटन व्यावसायिकांची मागणी

**कर्जत : प्रतिनिधी**

माथेरानमध्ये पर्यटन उद्योगाला मोठी गती प्राप्त झाली, मात्र गेल्या दहा-बारा वर्षांत मोठ्या प्रमाणात पाण्याचे दर वाढू लागले असून घरगुती वापरासाठीचा दर स्लॅबप्रमाणे किमान २६ रुपये ते कमाल ५३ रुपये प्रति एक हजार लिटर इतका आकारण्यात येतो. धर्मादाय संस्थानसाठीचा दर ६९ रुपये, तर हॉटेल्समध्ये तीन ग्रेडनुसार अ वर्ग १७८ रुपये, ब वर्ग १४१ रुपये व क वर्ग ११८ रुपये प्रति एक हजार लिटर वापरासाठी आकारण्यात येतो. त्यामुळे माथेरानमधील पर्यटन व्यवसाय संकटात येत चालला आहे.

मुंबई-पुण्याजवळील माथेरान हे सुप्रसिद्ध असे पर्यटनस्थळ आहे. दरवर्षी दहा लाखाहून अधिक पर्यटक माथेरानला भेट देतात. माथेरानला शारलोट लेक या एका तलावातून पाणीपुरवठा केला जातो. या तलावाची क्षमता केवळ १५० एमएलडी इतकी असल्याने पाण्याचा तुटवडा होत होता. १९९०च्या दशकात राज्य शासनाने नेरळ येथून उल्हास नदीचे पाणी पंप करण्याची स्कीम राबवली व हे पाणी सुरू झाल्याने पाण्याची समस्या सुटू शकली.

अन्य शहरांपेक्षा सर्वांत महाग पाणी दर हे माथेरानला आहेत, कारण नेरळहून अडीच हजार फूट उंच पाणी तीन स्टेजमध्ये पंप करावे लागते. यासाठी विद्युतपुरवठ्याचे बिल एक कोटी रुपयांच्या घरात जाते. त्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला दर वाढवावे लागतात, असे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. मुंबई महापालिकादेखील ठाणे नाशिक येथील तलावातून पाणी पंप करते, मात्र त्यांचे दर सहा व तीन रुपये झोपडपट्टीसाठी इतके आहेत. सातत्याने वाढणाऱ्या पाण्याच्या दरातून दिलासा मिळावा यासाठी सरकारने एक कोटी रुपयांचे अनुदान जीवन प्राधिकरणाला दिल्यास पाणी दर ५० टक्क्यांपर्यंत कमी होऊ शकतात. म्हणून स्थानिक व्यावसायिकांनी आमदार महेंद्र थोरवे यांच्याकडे अनुदानाची मागणी केली आहे.

येथील काही छोटे व्यावसायिक लॉजिंग चालवतात, मात्र कमाईचा निम्मा भाग पाण्याचे बिल देण्यातच जात असल्याचे त्यांनी सांगितले. पर्यटन उद्योगातून मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. माथेरान हे पूर्णपणे पर्यटनावर अवलंबून आहे. त्याचप्रमाणे जवळपासच्या गावातील लोकांना चांगले उत्पन्न मिळवता येते, मात्र सातत्याने वाढणाऱ्या पाणी दरांमुळे येथील व्यवसाय आर्थिक संकटात सापडला आहे. ज्या पद्धतीने शेती उद्योगाला शासन आर्थिक मदत देत असते तशीच मदत पर्यटनाला देण्याची गरज आहे.

## पाणीपुरवठामंत्र्यांकडे बैठक घेणार -आमदार महेंद्र थोरवे



शारलोट लेक व सिम्पसन टँक या दोन तलावांची क्षमता एक टीएमसी इतकी वाढवली, तर हे दर कमी होऊ शकतात व कायमस्वरूपी हा प्रश्न मिटेल, पण माथेरान पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील असल्याने केंद्र शासनाच्या परवानग्या घ्याव्या लागतील. यात बराच वेळ लागेल. त्यामुळे राज्य शासनाने प्राधिकरणाला अनुदान दिले, तर दर कमी हाऊ शकतात. या अनुषंगाने पाणी दर कमी करण्यासाठी पाणीपुरवठामंत्री गुलाबराव पाटील यांच्याकडे बैठकीचे आयोजन करणार असल्याचे आमदार महेंद्र थोरवे यांनी सांगितले.

# स्कुटीच्या धडकेत पादचारी जखमी

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील इंदापूर गावच्या हद्दीत ॲक्टिवा स्कुटीची धडक लागल्याने पादचारी व्यक्ती जखमी झाला. हा अपघात २३ ऑगस्ट रोजी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास घडला. याबाबतची फिर्याद प्रकाश काळू गायकवाड (वय ६३, रा. इंदापूर, ता. माणगाव) यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.

या अपघाताबाबत माणगाव पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, घटनेतील आरोपी नितीन सीताराम वाढवळ (रा. कालवण, ता. माणगाव) याने त्याच्या ताब्यातील ॲक्टिवा स्कुटी (एमएच ०६-बीझेड ७३६५) ही गाडी स्वतः चालवित अतिवेगाने येऊन मुंबई बाजूकडून माणगाव बाजूकडे जात असताना पादचारी व्यक्ती प्रमोद भिकू मोरे (वय ५५, रा. पानसई बौद्धवाडी, ता. माणगाव) हे रास्ता ओलांडून पलीकडे जात असताना त्यांना समोरून धडक दिली. या अपघातात प्रमोद मोरे जखमी झाले.

या अपघाताच्या गुन्ह्याची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात भा. दं. वि. संहिता कलम २७९, ३३७,३३८ मोटार वाहन कायदा अधिनियम १८४ प्रमाणे करण्यात येऊन स्कुटीचालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा अधिक तपास माणगाव पोलीस ठाण्याचे निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार दोडकुलकर करीत आहेत.

# माणगावमध्ये चोरी; गुन्हा दाखल

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहरात एका घरातील लाकडी कपाटात ड्राव्हरमध्ये ठेवलेली ३० ग्रॅम वजनाची सुमारे एक लाख ८० हजार रुपये किमतीची सोन्याची बांगडी घेऊन अज्ञात चोरटा फरार झाला आहे. ही घटना नुकतीच घडली. याबाबतची फिर्याद गीता महेंद्र मेथा यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.

माणगाव बाजारपेठ येथे राहणाऱ्या फिर्यादी गीता मेथा यांच्या घरात लाकडी कपाटातील ड्राव्हरमधील सुमारे एक लाख ८० हजार रुपये किमतीची ३० ग्रॅम वजनाची एक फुलांची, मिनार व जाळीदार डिझाईन असेलेली पिवळ्या रंगाची सोन्याची बांगडी कोणत्यातरी अज्ञात चोरट्याने चोरून नेली. या घटनेची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात येऊन अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा अधिक तपास माणगाव पोलीस ठाण्याचे निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक गायकवाड करीत आहेत.

# आरसीएफमधील नोकरभरतीच्या ऑनलाइन परीक्षेसाठी मार्गदर्शन

**अलिबाग : प्रतिनिधी**

राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलाइजर्स (आरसीएफ) लिमिटेडमध्ये कर्मचारी भरती करण्यात येणार आहे. यासाठी ऑनलाइन परीक्षा घेण्यात येणार आहे. त्यासाठी आरसीएफ थळ प्रकल्पातर्फे रायगड जिल्ह्याचे रहिवासी असलेल्या उमेदवारांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

भरतीपूर्व जागरूकता कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. ३० व ३१ ऑगस्ट रोजी सकाळी ८.३० ते संध्याकाळी ५.३० या दरम्यान आरसीएफ सभागृह, स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सशेजारी सरखेल कान्होजी आंग्रेनगर (आरसीएफ वसाहत), कुरूळ, अलिबाग येथे हा कार्यक्रम होईल. या वेळी अनुसूचित जाती-जमाती, इतर मागासवर्गीय, आर्थिकदृष्ट्या दुर्बल, दिव्यांग आणि अनारक्षित गटांतील पात्र उमेदवारांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात ऑनलाइन परीक्षेच्या संदर्भातील मार्गदर्शनासोबत संबंधित विषयांच्या तज्ज्ञांचा मार्गदर्शनाचा लाभ उपस्थित उमेदवारांना होईल. याव्यतिरिक्त स्पर्धात्मक परीक्षा विषयीचे खास तज्ज्ञ उमेदवारांना दोन दिवस विशेष प्रशिक्षण देतील.

या भरतीसंबंधीत मार्गदर्शन सत्राचे वेळापत्रक उमेदवारांना त्यांनी ऑनलाइन अर्जात नमूद केलेल्या ई-मेल आयडीवर कळविण्यात आले आहे. संबंधीत उमेदवारांनी या ई-मेलची प्रत (हार्ड किंवा सॉफ्ट कॉपी) तसेच आधार कार्ड (प्राधान्याने), पॅन कार्ड किंवा ड्रायविंग लायसन्सची छायाप्रत सोबत घेऊन त्यांना नेमून दिलेल्या वेळेत आरसीएफच्या कुरूळ वसाहतीमधील स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स शेजारील सभागृहात उपस्थित राहावे आणि मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आरसीएफचे वरिष्ठ व्यवस्थापक पंकज पाटील यांनी केले आहे.

# खालापुरात ड्रोन सर्व्हेचे काम प्रगतिपथावर

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील गावठाणांचे ड्रोनद्वारे करण्यात येणारे गावठाण सर्व्हे काम कर्मचारी आणि अधिकारी यांच्या प्रयत्नांनी रायगड जिल्ह्यातील इतर तालुक्यांच्या मानाने प्रगतिपथावर आहे.

ग्रामविकास विभागाच्या निर्णयानुसार राज्यातील गावठाण जमाबंदी प्रकल्प राबविण्यास मान्यता देण्यात आली. राज्यांतील सर्व गावांचे गावाठाणामधील जमिनीचे जीआयएस आधारे भूमापक व मोजणी करण्याची ही योजना आहे. या मोजणीत गावठाण क्षेत्रातील, नाला, ओढा, झाडे, कायमस्वरुपी खुणा यांची मोजणी होणार आहे. वहिवाट आणि बांधकामानुसार मोजणी झाल्यावर आपला हक्क अधिकार प्रस्तापित होणार आहे. त्यामुळे या मोजणीला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

खालापूर भूमी अभिलेख कार्यालयाकडून तालुक्यात १०२ गावांचे ड्रोन सर्व्हे कामकाज पूर्ण झाले. त्यापैकी ८५ गावांचे चौकशी काम पूर्ण झाले आहे. उर्वरित १७ गावांचे कामकाज अंतिम टप्प्यात असून लवकरच कामकाज पूर्ण करण्यात येईल, असे कार्यालयातून सांगण्यात आले. तालुक्यात अद्यापपर्यंत ४७ गावांचे सनद वाटप करण्यात आले असून त्यात १७ लाखांच्या वर रकमेची सनद फी शासन जमा झाली असून साधारणत: २७१८ इतक्या धारकांनी सनद प्राप्त करून मिळकतीची मालकी हक्क प्रमाणपत्र प्राप्त करून घेतले आहे. त्यामुळे सर्व नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

मोजणी होत असताना अनेकदा ग्रामपंचायत ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी उपस्थित राहत नाहीत. त्यांच्या विभागाचा आदेश आणि गावठाण हे त्यांचे कार्यक्षेत्र असूनही व त्यांना माहिती देऊनही उपस्थित राहत नाहीत तसेच तलाठी हेही उपस्थित राहत नाहीत, अशी माहिती प्राप्त झाली आहे.

स्वामित्व योजनेतंर्गत गावठाण मोजणी सर्व लोकांच्या फायद्याची असून आता खऱ्या अर्थाने मिळकतीची मालक म्हणून सनद मिळणार आहे. खालापूर तालुक्यातील भूमी अभिलेख कार्यालयाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नाने हे काम पूर्ण होईल असे वाटते. ते ग्रामसेवक व तलाठी यांची वाट पाहत बसले नाहीत.

# जय भारत ग्रामसंघाचे स्नेहसंमेलन उत्साहात


(छाया : धम्मशील सावंत)

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील गोमाशी येथे जय भारत ग्रामसंघाचे द्वितीय वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात झाले. गोमाशी ग्रामपंचायतीमधील दहा बचत गटातील महिलांनी एकत्र येऊन आनंदोत्सव साजरा केला तसेच वीरेश्वर महिला बचत गटाला २० वर्षे पूर्ण झाली म्हणून त्याचा विशेष सत्कार करण्यात आला.

सुधागड तालुक्यातील ३३ ग्रामपंचायतीमधील ४० ग्रामसंघांद्वारे बचत गटाचे कार्य केले जात आहे. बचत गटाच्या माध्यमातून महिलांना रोजगार संधी उपलब्ध होत आहेत. महिलांनी बचत गटाच्या माध्यमातून आपला विकास करीत असताना शाश्वत उपजीविकेवर भर देणे गरजेचे आहे. प्रभाग संघाकडून चार लाख बीज भांडवल व्यवसायासाठी उपलब्ध करून दिले जाते. महिलांनी फूड लायसन्स काढून व्यवसायातील सुरक्षितता वाढवता येईल. आपल्यामधील कौशल्य ओळखून व्यवसाय केला, तर त्याचा फायदा आपल्या बचत गटाच्या विकासासाठी होईल, असे प्रभाग समन्वयक सुधागड अनुराधा गायकवाड यांनी महिलांना मार्गदर्शन करताना सांगितले.

या कार्यक्रमासाठी माजी सरपंच भूषण सुतार, ग्रामसंघ अध्यक्ष दीप्ती उफाले, सचिव उर्मिला मगर, नारीशक्ती प्रभाग अध्यक्ष प्राची यादव, सचिव सानिका वालज, सीआरपी शर्वरी जंगम तसेच सर्व बचत गट अध्यक्ष, सदस्य महिला उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिपाली खैरे यांनी केले, तर आभार अश्विनी जंगम यांनी मानले.

# मुरूडच्या अंजुमन इस्लाम जंजिरा महाविद्यालयातर्फे डास दिनानिमित्त जनजागृती आणि स्वच्छता अभियान


(छाया : संजय करडे)

**मुरूड : प्रतिनिधी**

अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स मुरूड-जंजिरा महाविद्यालयातर्फे जागतिक डास दिवसानिमित्त प्राणीशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जनजागृती व स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

विद्यार्थ्यांनी महाविद्यालयासह परिसराचे सर्वेक्षण व स्वच्छता केली तसेच तेथील नागरिकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले. डासांपासून होणाऱ्या आजारांची सखोल माहिती दिली व डासांचे नियंत्रण करण्यासाठी उपाययोजना सांगितल्या. बाजारपेठ व आझाद चौक येथे पथनाट्य सादर करून डासांपासून होणारे आजार, या आजारांची लक्षणे, कारणे व त्यावर उपाययोजना याबाद्दल माहिती दिली.

अभियान यशस्वी करण्यासाठी प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली प्राणीशास्त्र विभाग प्रमुख प्रा. जाविद खान, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. नितीन पवार, प्रा. समिक्षा माळी, विद्यार्थ्यांमध्ये हुमेरा घारे, अमरीन छापेकर, अजमा चिलवान, सना कारभारी, राशी शहा, अफ्शा उलडे, रोजमीन कासकर, मानवी नाकती, बतुल हमदुले, सानिया मलेकर, वेदिका कोतवाल, मृणाली भोईर, ईश्वरी चोगले, शाहजीन फहीम, इमाद गजगे, मोहम्मद कैफ, ओमकार म्हात्रे, सानिका कौलकर यांनी अथक परिश्रम घेतले.

## जागतिक ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप

# भारतीय पुरुष रिले संघाने आशियाई विक्रम मोडला

**बुडापेस्ट : वृत्तसंस्था**

हंगेरीतील बुडापेस्ट येथे सुरू असलेल्या जागतिक ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये भारतीय खेळाडूंनी ऐतिहासिक कामगिरी केली आहे. भारताच्या पुरुष संघाने या चॅम्पियनशिपच्या ४ बाय ४०० मीटर रिले शर्यतीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. विशेष म्हणजे मुहम्मद अनास याहिया, अमोज जेकब, मुहम्मद अजमल वरियाथोडी आणि राजेश रमेश या भारतीय खेळाडूंनी या शर्यतीत २:५९.०५ अशी वेळ नोंदवून आशियाई विक्रम मोडला.



यंदाच्या जागतिक ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये भारताला आतापर्यंत एकही पदक मिळालेले नाही. या वेळी देश भालाफेकपटू नीरज चोप्राची वाट पाहत होता. अशातच भारतीय पुरुषांच्या ४ बाय ४०० मीटर रिले संघाने चमकदार कामगिरी केली आणि भारतासाठी आणखी एका पदकाच्या आशा उंचावल्या. भारतीय पुरुष अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले आहे. या चार खेळडूंनी आशियाई विक्रम मोडला. यापूर्वीचा विक्रम जपानच्या खेळाडूंच्या नावावर होता (२ मिनिटे ५९:५१ सेकंद) होता. भारतीय संघाने अमेरिकेनंतर दुसरे स्थान मिळवून अंतिम फेरीत प्रवेश केला आहे.

या रिले शर्यतीत भारताकडून संथ सुरुवात झाली होती. मोहम्मद अनस याहियाने संघाला संथ सुरुवात करून दिली. पहिल्या फेरीनंतर भारत सहाव्या क्रमांकावर होता. यानंतर अमोज जेकबने संघाचा वेग वाढवला आणि भारताला दुसऱ्या स्थानावर नेले. यानंतर मोहम्मद अजमल वरियाथोडी आणि राजेश रमेश यांनी आपल्या उत्कृष्ट वेगाच्या जोरावर शेवटच्या दोन टप्प्यात भारताला क्रमांक एकवर ठेवत अंतिम फेरीसाठी पात्र ठरले. अशा प्रकारे इतिहास रचत भारतीय रिले संघाने प्रथमच जागतिक अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले.

# मांडवा येथे नारळीपौर्णिमेला राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा


**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील मांडवा बंदर येथे नारळीपौर्णिमेच्या दिवशी अर्थात ३० ऑगस्टला सालाबादप्रमाणे टाकादेवी स्पोर्ट क्लब व ग्रामस्थ मंडळ यांच्या सौजन्याने दुपारी २.३० वाजता राज्यस्तरीय कुस्त्यांचे जंगी सामने आयोजित करण्यात आले आहेत.

या स्पर्धेत तालुका, जिल्हा व इतर राज्य तसेच राष्ट्रीय स्तरावरील नामांकित पैलवान व आखाडे उपस्थित राहणार आहेत. विजेत्यांना रोख रक्कम व आकर्षक बक्षिसे देऊन गौरविण्यात येणार आहे. गुणानुसार एक ते तीन आखाड्यांना चषकही देण्यात येतील.

स्पर्धेचे उद्घाटन रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण, खासदार सुनील तटकरे, आमदार आशिष शेलार, आमदार महेंद्र दळवी, राजिपचे माजी सभापती दिलीप भोईर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

मांडवा बंदर येथे कुस्ती स्पर्धेची मोठी परंपरा आहे. यंदाही नारळीपौर्णिमेला भव्य कुस्ती स्पर्धा होणार आहे.



### व्यासपीठाचे होणार लोकार्पण

मांडवा बंदर येथे आमदार महेंद्र दळवी यांच्या सौजन्याने व हस्ते पारंपरिक किनारा कुस्ती स्पर्धेसाठीचा व्यासपीठ लोकार्पण व कृतज्ञता सोहळा दुपारी ३ वाजता होणार आहे. या सोहळ्यास शिवसेना जिल्हाप्रमुख राजा केणी, तालुकाप्रमुख अनंत गोंधळी, विभागप्रमुख संदेश थळे, मंडळाचे अध्यक्ष केशव पाटील, उपाध्यक्ष अशोक घरत, सुनील पाटील आणि पदाधिकारी व इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# वर्ल्डकपमध्ये रोहित शर्मा सर्वाधिक धावा करेल

### वीरेंद्र सेहवागचे भाकित

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

एकदिवसीय विश्वचषक सुरू होण्यासाठी ५० दिवसांपेक्षा कमी दिवस शिल्लक राहिले आहेत. भारतात होणाऱ्या या स्पर्धेला ५ ऑक्टोबरपासून सुरुवात होणार असून ती १९ नोव्हेंबरपर्यंत खेळवली जाणार आहे. याआधी टीम इंडियाचा माजी सलामीवीर वीरेंद्र सेहवागने मोठी भविष्यवाणी केली आहे. टीम इंडियाचा कर्णधार रोहित शर्मा या स्पर्धेत सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरेल, असे त्याने म्हटले आहे.

विश्वचषकात टीम इंडियाला ८ ऑक्टोबरला चेन्नईमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध पहिला सामना खेळायचा आहे. तत्पूर्वी, सेहवाग म्हणाला की, भारतातील फलंदाजीला अनुकूल असलेल्या परिस्थितीमुळे पुढील एकदिवसीय विश्वचषकादरम्यान सलामीवीरांना चमकण्याची संधी मिळेल. आयसीसीच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवर पोस्ट केलेल्या एका व्हिडीओमध्ये सेहवागला विचारण्यात आले होते की, २०२३च्या विश्वचषकात सर्वाधिक धावा कोण करणार?

वीरेंद्र सेहवागने रोहित शर्माची निवड केली आणि म्हणाला, भारताकडे चांगल्या खेळपट्टी आहेत. त्यामुळे मला वाटते की सलामीवीर फलंदाजांना चांगली संधी मिळेल. जर मला एकाची निवड करायची असेल, तर मी रोहित शर्माचे नाव घेईन. इतर नावे आहेत, पण मी भारतीय आहे आणि मी भारतीय निवडले पाहिजे. त्यामुळे रोहित शर्मा.

सेहवागने भारतीय सलामीवीर आणि कर्णधार रोहित शर्माचे कौतुक केले. त्याने सांगितले की, विश्वचषक अनेकदा तो सर्वोत्तम फॉर्ममध्ये दिसला आहे. तो म्हणाला, जेव्हा विश्वचषक येतो, तेव्हा त्यांची ऊर्जा पातळी, कामगिरी उंचावते. त्यामुळे तो चांगली कामगिरी करेल याची मला खात्री आहे. या वेळी तो कर्णधारही आहे. मला खात्री आहे की, तो बदल घडवून आणेल आणि भरपूर धावा करेल.

## आशिया चषकातून लिटन दास बाहेर

**ढाका : वृत्तसंस्था**

बांगलादेशचा स्टार फलंदाज लिटन दास आजारपणामुळे आशिया चषकासाठी श्रीलंकेला जाणाऱ्या बांगलादेशी संघाचा भाग असणार नाही. याबाबत बीसीबीच्या अधिकाऱ्यांनी माहिती दिली. त्यामुळे आता पुन्हा बांगलादेश संघाच्या अडचणी वाढल्या आहेत.

आशिया चषक स्पर्धा ३० ऑगस्ट ते १७ सप्टेंबरदरम्यान हायब्रीड मॉडेल अंतर्गत श्रीलंका आणि पाकिस्तानमध्ये खेळवली जाणार आहे. बांगलादेशचा दुखापतग्रस्त इबादत हुसेनच्या जागी संघात समाविष्ट केलेला युवा वेगवान गोलंदाज तनझिम हसन शाकिब हादेखील संघासोबत प्रवास करणार नाही. त्याचे तिकीट अद्याप निश्चित झालेले नसल्याने तो नंतर जाईल.

# आशिया चषकाच्या कामगिरीवर होणार टीम इंडियाची वर्ल्डकपसाठी निवड

## पाच खेळाडूंवर असणार बीसीसीआयची नजर



कुलदीप यादव | तिलक वर्मा | अक्षर पटेल | प्रसिद्ध कृष्णा | सूर्यकुमार यादव

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आशिया चषक क्रिकेट स्पर्धा ३० ऑगस्टपासून सुरू होत असून भारताचा पहिला सामना पाकिस्तानविरुद्ध २ सप्टेंबरला असणार आहे. टीम इंडिया 'अ' गटात पाकिस्तान आणि नेपाळविरुद्ध सामने खेळणार आहे. भारत आशिया चषक विजेतेपदाचा प्रबळ दावेदार आहे. हा आशिया चषक अनेक खेळाडूंसाठीही महत्त्वाचा आहे, कारण येथे जे खेळाडू चांगली कामगिरी करतील त्यांची विश्वचषक संघात वर्णी लागणार आहे. त्यात प्रमुख पाच खेळाडूंवर बीसीसीआय निवड समितीची नजर असणार आहे.

पाकिस्तान आणि नेपाळ यांच्यातील पहिल्या सामन्याने आशिया चषक स्पर्धेला सुरुवात होणार आहे. त्यानंतर पाकिस्तान श्रीलंकेला रवाना होईल, जिथे त्यांचा सामना टीम इंडियाशी होईल. याची दोन्ही देशांतील चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत. जर के.एल. राहुल पहिल्या सामन्यात खेळला नाही, तर इशान किशन प्लेइंग ११मध्ये यष्टीरक्षक म्हणून समाविष्ट होऊ शकतो. वनडेत पहिल्यांदाच निवडलेल्या तिलक वर्मासाठीही ही स्पर्धा खास आहे. भारतीय संघात पाच खेळाडू असे आहेत की, त्यांची कामगिरी चांगली राहिली नाही, तर ते विश्वचषक संघातून बाहेर होऊ शकतात.

कुलदीप यादव हा एक अनुभवी फिरकी गोलंदाज आहे जो आशियाई खेळपट्ट्यांवर चांगली कामगिरी करतो. कुलदीपने ८४ एकदिवसीय सामन्यांमध्ये १४१ विकेट्स घेतले असून त्याचा सर्वोत्तम स्पेल ६/२५ आहे. आशिया कपमध्ये त्याला युजवेंद्र चहलऐवजी पसंती देण्यात आली आहे. कुलदीपची एकदिवसीय क्रिकेटमध्ये ५.१६ इकॉनॉमी आहे. जर तो आशिया चषकात अपेक्षेप्रमाणे राहिला नाही, तर त्याचे विश्वचषक संघात स्थान मिळणे फार कठीण होईल.

हैदराबादमध्ये जन्मलेल्या तिलक वर्माने आयपीएलच्या या मोसमात प्रभावित केले, त्यानंतर वेस्ट इंडिजविरुद्धच्या त्याच्या पदार्पणाच्या टी-२० मालिकेत चांगली कामगिरी केली. वेस्ट इंडिजमधील खेळपट्ट्या गोलंदाजांना मदत करीत होत्या, पण तिथे तिलक वर्माने सर्वांना खूश केले. त्यामुळे त्याची आशिया चषक संघात निवड झाली आहे, परंतु हे वेगळे स्वरूप आहे आणि त्याची ही पदार्पण मालिकाही आहे. जर तिलक वर्मा प्लेइंग ११चा भाग असेल आणि त्याची कामगिरी खराब राहिली, तर त्यांचे विश्वचषक खेळण्याचे स्वप्न यंदा अपूर्ण राहू शकते.

आयपीएलमध्ये अष्टपैलू खेळाडू म्हणून अक्षर पटेलने छाप पाडली, जिथे दिल्लीचे आघाडीचे फलंदाज अपयशी ठरले तिथे तो तंबू ठोकून उभा होता. टी-२० फॉरमॅटची चर्चा वेगळी आहे, अक्षरची भूमिका वन डेमध्ये मोठी असेल. जेव्हा गरज असेल तेव्हा त्याला डाव सांभाळावा लागेल आणि गोलंदाज म्हणून मधल्या फळीत धावांचा वेग रोखत विकेट्स घ्याव्या लागतील. अक्षरने ५२ एकदिवसीय सामन्यांमध्ये ५८ विकेट्स घेतल्या आहेत. त्याची इकॉनॉमी ४.५१ आहे. त्याच्यासाठी आशिया चषक स्पर्धेत चांगली कामगिरी करणे महत्त्वाचे असेल.

२७ वर्षीय प्रसिद्ध कृष्णाने १४ एकदिवसीय सामने खेळले असून त्यात २५ विकेट्स घेतल्या आहेत. त्याची इकॉनॉमी ५.३२ आहे. जसप्रीत बुमराह दुखापतीतून परतल्याने इतर वेगवान गोलंदाजांचीही महत्त्वाची ठरणार आहे. प्रसिद्ध कृष्णा हा आशिया चषकात महत्त्वाच्या वेगवान गोलंदाजांपैकी एक आहे, त्याला संधी मिळाल्यास त्याचा फायदा घ्यावा लागेल, कारण इथे तो अपयशी ठरला तर त्याच्यासाठी विश्वचषकात जाणे खूप कठीण होईल.

स्फोटक फलंदाज सूर्यकुमार यादवने टी-२०मध्ये आपले स्थान पक्के केले आहे, परंतु तो अद्याप एकदिवसीय सामन्यांमध्ये स्वत:ला सिद्ध करू शकलेला नाही. त्याच्याकडे टी-२० खेळाडू म्हणून पाहिले जाते. आशिया चषक एकदिवसीय फॉर्मेटमध्ये खेळला जाणार असल्याने त्याला इथेही चांगले खेळणे आवश्यक आहे. विश्वचषकही एकदिवसीय फॉर्मेटमध्येच होणार असल्याने आशिया चषकात सूर्यकुमार यादवला या फॉरमॅटमध्ये स्वत:ला सिद्ध करावे लागणार आहे. सूर्याने आतापर्यंत खेळलेल्या २६ एकदिवसीय सामन्यांमध्ये १०१.३८च्या स्ट्राईक रेटने ५११ धावा केल्या आहेत. त्याची सरासरी २४.३३ आहे.

# रवींद्र जडेजाला आशिया चषकात नंबर वन गोलंदाज बनण्याची संधी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आशिया चषक स्पर्धेचा १४वा हंगामा ३० ऑगस्टपासून सुरू होणार आहे. या स्पर्धेत टीम इंडिया २ सप्टेंबरला पाकिस्तानविरुद्ध मोहिमेला सुरुवात करेल. गोलंदाजीत जसप्रीत बुमराह आणि मोहम्मद शमीबद्दल सर्वजण बोलत आहेत, पण एका खेळाडूची आकडेवारी एकदिवसीय आशिया चषकात सर्वाधिक विकेट्स घेणाऱ्या गोलंदाजाची आहे, तो म्हणजे भारताचा स्टार अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजा.

या वेळी असे बहुतेक गोलंदाज टीम इंडियाच्या लाइनअपमध्ये प्रवेश करतील त्यांनी जास्त आशिया कप खेळला नाही. शमी आणि बुमराह हे अनुभवी आहेत, पण दोघांनी या स्पर्धेत केवळ चार सामने खेळले आहेत. अशा वेळी रवींद्र जडेजा केवळ अनुभवीच नाही, तर आगामी स्पर्धेत इतिहासही रचू शकतो.



एकदिवसीय आशिया चषक स्पर्धेत आतापर्यंत २४ सामन्यांत ३० बळी घेणारा श्रीलंकेचा माजी दिग्गज खेळाडू मुथय्या मुरलीधरन अव्वल स्थानावर आहे, पण विशेष म्हणजे सर्व टॉप १० खेळाडूंनी निवृत्ती घेतली आहे. त्याचबरोबर भारताचा रवींद्र जडेजा आणि बांगलादेशचा शाकिब अल हसन अनुक्रमे नवव्या आणि दहाव्या क्रमांकावर आहेत. दोघांच्या नावावर प्रत्येकी १९ विकेट आहेत. म्हणजेच आगामी स्पर्धेत दोघांना आशिया चषकातील नंबर १ गोलंदाज बनण्याची संधी आहे. यंदाच्या स्पर्धेत प्रत्येक संघ जास्तीत जास्त सहा सामने खेळू शकतो. जर संघ सुपर-४पर्यंत गेले आणि अंतिम फेरीत पोहचले नाहीत, तर ते किमान पाच सामने खेळतील.

एकदिवसीय आशिया कपच्या इतिहासात जडेजाने आतापर्यंत १४ सामन्यांच्या १४ डावांत १९ विकेट्स घेतल्या आहेत. भारताकडून एकदिवसीय आशिया कपमध्ये इरफान पठाणने सर्वाधिक २२ विकेट घेतल्या आहेत, पण तोही निवृत्त झाला आहे.

# आंतरराष्ट्रीय बीच टेनिस स्पर्धेत भारताची चमक

**पटाया : वृत्तसंस्था**

थायलंडमधील पटाया येथे नुकत्याच झालेल्या आयटीएफ पटाया ओपनमध्ये भारताच्या उन्नत सांगळे आणि विश्वजीत सांगळे या जोडीने आपली चमक दाखवली.

भारतीय जोडीने स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत थायलँडच्या क्रितीकाम हनमोंत्री आणि कासिम वलईसाथेनसिल्पा यांचा २-६ ६-४ १०-६ असा पराभव करीत उपांत्य फेरीत मजल मारली. त्यांना जपानच्या अकिरा नाबाता आणि नाओटो तानुका या जोडीकडून ६-२ ६-० असा पराभव स्वीकारावा लागला.



मिश्र दुहेरीत भारताच्या उन्नत सांगळे आणि थायलँडच्या पेया निचाकर्ण जोडीने स्पेनच्या जॉर्ज सोलज आणि मार्था मेसेकबॅडो यांच्यावर ४-६ ६-२ ११-९ असा विजय नोंदवत उपांत्यपूर्व फेरीत गाठली, जिथे त्याना थायलँडच्या जोडी करून पराभव स्वीकारावा लागला.

स्पर्धेत २०हून अधिक देश सहभागी होते. यानंतर ऑलिम्पिक बीच गेममध्ये उत्तम कामगिरी करण्यासाठी उन्नत व विश्वजीत सहभागी होणार होते, पण या स्पर्धेचे आयोजन ऐनवेळी रद्द झाले. पुढील आवृत्तीसाठी दोन्ही खेळाडूंची कामगिरी महत्त्वपूर्ण ठरणार आहे तसेच स्पर्धामधील प्रदर्शनामुळे भारताची बीच टेनिस या क्रीडा प्रकारातील आंतरराष्ट्रीय क्रमवारीत सुधारणा होणार हे निश्चित आहे.









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com